अहम् आवाम्

# वयम्

वर्ष अकरावे | अंक ११ | मे २०२४ | पृष्ठे ५२

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य ₹९०/-



# एक स्मार्ट सायकल

## इलेक्ट्रिक बायसिकल

## विदु




सायकलने लांबवर प्रवास करताना पॅडल मारून पाय थकले की मनात येते, आता ही आपोआप चालली तर! अशा वेळी 'इलेक्ट्रिक बायसिकल' हा पर्याय सोयीचा! पॅडल मारून पाय भरून आले की, एक कळ दाबायची आणि मोटार सुरू करायची की, झाली ऑटोमॅटिक सायकल! त्यासाठी 'लॅबइंडिया' कंपनीने सोयीची अशी 'इलेक्ट्रिक बायसिकल' विकसित केली आहे. लॅबइंडिया कंपनीने तयार केलेली 'विदु' आता वितरणासाठी सज्ज झाली आहे.

MAKE IN INDIA

'विदु'चे प्रत्यक्ष वितरण आता सुरू झाले आहे. इच्छुकांनी त्यांचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक अनंथ पिल्लाई- (**Whatsapp** : 9167033497, **Email** : Ananth.Pillai@labindia.com) यांना कळवावा, म्हणजे त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

LABINDIA®

**Labindia Equipments Pvt. Ltd.**
201, Nand Chambers, L. B. S. Marg, Near Vandana Cinema,
Thane - 400 602, India.

**Contact :+91-022-25986160 , +91-022-69086160**

RNI NO.MAHMUL/2013/53138

अहम् आवाम्

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

# वयम्

वर्ष ११ | अंक ११ | मे २०२४

चैत्र / वैशाख शके १९४६

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
राजीव तांबे

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
जुईली आणि वैष्णवी माहीमकर

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे, अदिती पाध्ये-देसाई, जुईली माहीमकर

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले.
या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्', न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग

- संपादकीय : शुभदा चौकर- ४
    - गृहपाठ : घराने करायचा धमाल अभ्यास! : राजीव तांबे- ६
- ससा हरला त्याची गोष्ट : जोसेफ तुस्कानो- १२
    - 'पुष्पक'ची भरारी : डॉ. बाळ फोंडके- १४
- सुरकुत्यांची शिकवण : वासंती फडके- १८
    - कुटुंब रमलंय वाचनात! : अनुजा संखे- २२
- कल्पककला : स्वरूपा वक्नाली- २४
    - मिनू : अदिती पाध्ये-देसाई- २५
- खाद्यसफर- उन्हाळ्यातला गारवा.. : डॉ. मंजूषा देशपांडे- २६
    - दंगल : डॉ. हर्षदा देवधर- ३०
- Sky is the limit... : Prachi Mokashi- ३६
    - पकोडे- ळीखडपाको : राजीव तांबे- ४०
- मनोविकास : वैदेही भिडे- ४२
    - फुलांना रंगवतं कोण? : डॉ. हर्षदा बाबरेकर- ४४
- 'अंऽऽअं'वर उपाय! - डॉ. प्रमोद बेजकर- ४६
    - रवींद्रनीती : रवींद्रनाथ टागोर/ सुमती जोशी- ४८
- Witty Talks : Prachi Mokashi- ४९
    - पझल, शब्दखेळ अशा ॲक्टिव्हिटीज : वैष्णवी माहीमकर, आराध्य नाईक आणि अदिती पाध्ये-देसाई- १७, २१, ३४ , ३५, ४१

**'बहुरंगी बहर' २०२४ प्रकल्पाची तयारी जोरात सुरू आहे. जुलै २०२४च्या 'वयम्' अंकात 'बहुरंगी बहर'ची प्रश्नावली प्रसिद्ध होणार आहे. या आगळ्या-वेगळ्या स्पर्धेत नक्की भाग घ्या.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

## संपादकीय

# सांस्कृतिक वसंत!

**‘वयम्’ दोस्तांनो,**

मध्यंतरी एक उत्तम कार्यक्रम अनुभवला. कुमार गंधर्व यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ग्रंथालीने ‘गंधर्वांचे देणे’ हे एक सुंदर पुस्तक प्रसिद्ध केलं. त्याचा प्रकाशन समारंभ होता. तोही सुरेख आणि सुरेल झाला. कुमार गंधर्व हे सर्जनशील संगीतकार व प्रतिभावान गायक. या पुस्तकात त्यांच्या मुलाखती शब्दांकित केल्या आहेत. त्या मुलाखती साहित्यिक मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांच्यासह काही दिग्गजांनी १९८५ मध्ये घेतल्या होत्या.




कुमार गंधर्व यांचं मूळ नाव शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकाळी. ते सात वर्षांचे असताना गुरुकल्ल मठाचे शांतिवीरस्वामी यांनी त्यांचं विलक्षण गायन ऐकून त्यांना ‘कुमार गंधर्व’ ही पदवी दिली. सात वर्षांचा हा कुमारवयीन मुलगा उत्तम गायला लागला, हा चमत्कार नव्हता. लहानपणापासून त्यांनी उत्तमोत्तम संगीत कान देऊन ऐकलं होतं. गायनाचा ध्यास घेऊन दिवस-रात्र गाण्याचा विचार केला होता.

वयाच्या २४व्या वर्षी त्यांना टी.बी. चा आजार झाला. त्यानंतर त्यांना पाच वर्षं गायला बंदी होती. त्या काळातही त्यांनी संगीताचा अभ्यास आणि विचार चालू ठेवला. खेड्यापाड्यांमधल्या महिला लोकगीतं गात, त्या लोकसंगीताचे शब्द, चाल समजून घेतले. तब्येत बरी झाल्यावर ते पुन्हा गाऊ लागले. त्यांनी स्वतः अनेक बंदिशी रचल्या. त्यांच्या मैफिली म्हणजे रसिकांसाठी अवर्णनीय अनुभव असे.

कुमार गंधर्व इतके थोर कसे झाले याची कारणं या ‘गंधर्वांचे देणे’च्या प्रस्तावनेत संपादक अतुल देऊळगावकर यांनी उलगडून सांगितली आहेत. कुमार गंधर्व यांना प्रत्येक विषयाबद्दल कुतूहल होतं. ते प्रत्येक विषय समजून घेत. त्यांचं वाचन अफाट होतं. त्यांच्याकडे दोन हजार पुस्तकांचा संग्रह होता. ते प्रवास खूप करायचे. निसर्गाची बारीक निरीक्षणं करायचे. ‘कोणत्याही कलाकाराला सर्व कलांविषयी आपुलकी असेल तर त्याची कला अधिक बहरेल’, असा समग्र दृष्टिकोन होता त्यांचा!

‘कुमार स्वर - एक गंधर्व कथा’ हे माधुरी पुरंदरे यांनी मुलांसाठी लिहिलेलं आणि चंद्रमोहन कुलकर्णी यांची सुंदर चित्रं असलेलं लोभस चरित्र तुम्ही वाचलंय का? कुमार गंधर्व हे संगीतातले एवढे मोठे आयकॉन कसे झाले, हे ते पुस्तक वाचल्यावर समजतं. त्यात एक उल्लेख आहे- ‘मन प्रसन्न करणाऱ्या सुंदर निसर्गाचं वर्णन कुमारजींनी अनेक बंदिशींमध्ये केलेलं आहे.

पण रुसलेला निसर्गही त्यांनी एका बंदिशीतून दाखवला आहे.'

*'ऐसे कैसो आयो रिता रे*
*अंबुवा पे मोर ना आयो....'*

त्या बंदिशीचा अर्थ आहे- 'असा कसा हा वसंत ऋतू? आंब्यावर मोहोर आलेला नाही, भुंगा गुंजन करत नाही, फुलांचा रंग खुलून आलेला नाही...'

याच बंदिशीबद्दल 'गंधर्वांचे देणे'च्या प्रस्तावनेत संपादक अतुल देऊळगावकर यांनी सांगितलेले संदर्भ वाचले की, प्रतिभावंत कसे एकसमान विचार करतात, याची प्रचीती येते. ते म्हणतात की, १९६२ मध्ये अमेरिकन जीवशास्त्रज्ञ राशेल कार्सन यांनी 'सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक लिहिलं, ते पुढे जगप्रसिद्ध झालं. या पुस्तकात त्यांनी स्प्रिंगचं बिघडलेलं भयाण वर्णन केलं होतं. अनेक पक्षी आजारी पडले होते, काही पक्षी मेले होते. तिथला वसंत ऋतू 'म्यूट' झाला होता. आणि त्याच काळात अमेरिकेपासून हजारो कि.मी. दूर असलेले कुमार गंधर्व त्यांच्या बंदिशीतून रुसलेला वसंत ऋतू सादर करत होते! वसंत हा खरं तर बहारदार ऋतू. रंगीबेरंगी फुलोरा, पक्ष्यांचा किलबिलाट, मोहक सुगंध ही त्याची खासियत! पण एखाद्या वर्षी त्याचं तसं नसणं टिपणारी जीवशास्त्रज्ञ राशेल काय किंवा कलावंत कुमार गंधर्व काय, यांची निरीक्षणशक्ती आणि संवेदनशीलता तितकीच उत्कट!

कुमार गंधर्वांची ही चरित्रं वाचताना लक्षात येतं की, ते निसर्गाची रूपं आणि सामान्य माणसांचं जगणं यांची सखोल निरीक्षणं आणि त्यासंदर्भात विचार करत असत, त्याचं दर्शन त्यांच्या बंदिशींत उमटलं आहे.

तुम्ही बघताय ना तुमच्या आजूबाजूच्या निसर्गाकडे नीट? कित्ती काय काय घडत असतं या निसर्गात?

मुंबईसारख्या सिमेंटने भरलेल्या महानगरातही



निसर्गाची कितीतरी रूपं पाहायला मिळतात. अलीकडेच मी 'मुंबईचा चेरी ब्लॉसम' ज्याला म्हणतात, तो 'टॅबुबिया'चा मनमोहक बहर बघून आले. पिंक ट्रम्पेट, बसंत रानी अशा नावांनी ओळखली जाणारी ही गुलाबी, पांढरी, जांभळी फुलं अतिशय नाजूक, हलकी असतात. पूर्व द्रुतगती मार्गावर विक्रोळी भागात ही अनेक झाडं भरगच्च फुलं अंगावर लेवून रांगेत उभी आहेत. शिवाय मुंबई शहरभर हा गुलाबी, जांभळा बहर कुठे कुठे दिसतोय. शिवाय महाराष्ट्राचे राज्यफूल तामण त्याच्या मोहक झुपक्याने मन मोहून टाकतंय. आणि पिवळा बहावा तर निव्वळ अहाहा! मोगरा, बकुळ, अनंत अशी फुलझाडं त्यांच्या सुगंधाने मन प्रसन्न करताहेत.

शिरीष पै यांनी एका कवितेत म्हटल्याप्रमाणे-

*हिंडताना रस्त्यावर, फुले भेटली अनंत*
*आणि देतो आलिंगन, स्पर्शावाचून वसंत!*

मुंबईत जिकडेतिकडे बांधकाम, धूळ असताना सुद्धा वसंतात ही फुलं फुललीयेत, कमी प्रदूषण असलेल्या प्रांतात तर नाका-डोळ्यांची चंगळ असेल!

या सुट्टीत पाचही इंद्रियांचा भरपूर वापर करा. आपल्या या अंकात तुम्हांला मजा येईल, अशा अनेक गोष्टी सुचवल्या आहेत. त्या करताना जे जे अनुभव घ्याल, ते लिहून पाठवायला विसरू नका. त्या प्रक्रियेतली मजा लिहून ठेवली तर ती आपल्या मेमरीत कायम राहते.

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

# गृहपाठ: घराने करायचा धमाल अभ्यास!

**आता** सुटी! म्हणजे शाळेतल्या अभ्यासाला सुटी आणि धमधमाल, मस्तम्मस्ती करत शोधाशोधीच्या गृहपाठाला सुरुवात.

हा सुटीतला गृहपाठ घरातल्या सगळ्यांनी मिळून करायचा आहे. घरातले सगळे म्हणजे, आई, बाबा, भाऊ, बहिणी, गुगलकाकू, गुगलबाबा आणि घरातील सगळ्यांचा आवडता नातेवाईक 'स्मार्ट फोन' यांचा सगळ्यांचा मुक्त सहभाग हवा. आपल्या कुटुंबात नव्यानेच येत असलेले 'श्री. चॅटजीपिटी आणि त्यांचे नातेवाईक एआय' यांचीही मदत बिनधास्त घ्या.

हा 'गृहपाठ' नवीन शोधण्याचा, हसण्याचा, मस्तीचा, मजेचा आणि इतकंच काय तर काहीवेळा निरर्थक पण आहे!

आणि हो.. यातील काही गोष्टी तुम्ही केल्यावर, शोधल्यावर, लिहिल्यावर आम्हांला जरूर कळवा आणि तुमच्या मस्तामस्ती, मजामजीत आम्हांलाही सहभागी करून घ्या.

**१. तुमच्या घरात सिलींग फॅन तर आहेच. तो घड्याळयाचा दिशेने फिरतो की विरुद्ध दिशेने? हे तुम्ही कसं शोधाल? सिलींग फॅन आणि टेबल फॅन एकाच दिशेने फिरतात की वेगवेगळ्या? का? दोघांच्या रचनेत मूलभूत फरक काय आहे? काढा शोधून.**



**२. स्वयंपाक करताना तेल तापलं आहे की नाही, हे पाहण्यासाठी मोहरीच का घालतात? जिरं का घालत नाहीत? मला खात्री आहे, याचं उत्तर घरातील ज्येष्ठ गुगलकाकू सांगू शकतील.**

**३. तुम्हांला घरातील इंटिरीयर पूर्णपणे बदलायचं आहे. अगदी वाट्टेल तसं बदलायचं आहे.. म्हणजे स्वयंपाकघरात वॉशिंग मशीन ठेवायला आणि मिक्सर बेडरूममध्ये ठेवायला पूर्ण परवानगी आहे.. पण हे सर्व फक्त कागदावरच! त्यासाठी घरातील सगळ्या वस्तूंची मापं काढा. लांबी, रुंदी आणि उंची. मग घराचा नकाशा. आणि आता या घरातल्या नकाशावर ठेवा तुमच्या वस्तू तुम्हांला हव्या**

तिथे. खोली मोठी करायची असेल तर कागदावरच्या भिंती सरकवायला किंवा पाडायला परवानगी आहे. हे तुमचे इनोव्हेटिव्हली रिनोव्हेटेड घर पाहायला आम्हांला आवडेल.

४. १३ सुंदर निरर्थक वाक्यांची एक मस्त निरर्थक गोष्ट तयार करा. म्हणजे वाक्यांना काडीमात्र अर्थ नको, गोष्ट मात्र 'मस्त निरर्थक' असावी. करा सुरुवात.

५. प्राणी आणि पक्षी यांच्या तुम्हांला माहीत नसलेल्या किमान ३९ गोष्टी शोधा. शक्य असल्यास आम्हांलाही कळवा. (उदा. मुंगीला दिसत नाही. डासाला सोंड असते. माशीला २००० डोळे असतात.)

६. दिवसभरात तुम्ही किती वेगवेगळे आकार वापरता याची किमान तीन दिवस नोंद ठेवा. (उदा. गोल, चौकोन, आयत, शंकू, पट्टी, गोल-आयत, लंबगोल-पट्टी इ.)

७. २६ नवीन उपमा शोधा. कृपया यासाठी 'गुगल परिवारातील' कुणाची मदत घेऊ नका, ते हँग होतील. अपना दिमाग लगाओ और हमें बताओ. (उदा. दहीभात म्हणजे हिमालय. निळा नाइट लॅम्प म्हणजे निळी पणती इ.)



८. सायकल चालवता येत नसेल तर ती शिका. सायकल येत असेल तर, गावातल्या किमान १३ अनोळखी रस्त्यांवरून फेरफटका मारा. नवीन रस्ते शोधा. गावाची, शहराची ओळख करून घ्या. सर्वांनी मिळून 'सायकल ट्रिप' काढा. आम्हांलाही कळवा.

९. हिंगाची डबी उघडल्यावर येणाऱ्या वासाचं नाव काय? जिरं हातावर भरडल्यावर येणाऱ्या वासाचं नाव काय? ग्लुकोज बिस्किट आणि मोनॅको बिस्किट या दोघांचा वास वेगळा आहे? अशा वेगवेगळ्या २६ वासांची नवीन नावं तयार करा. (उदा. ताज्या गुळाचा गोडगिट्ट वास. गुळाच्या पाकाचा गुळमट वास.)

१०. तुम्हांला किती रंगांची नावं माहीत आहेत? आमच्या इयत्ता तिसरीतल्या मुलांनी ९१ रंगांची यादी तयार केली. उदा. पांढऱ्या काचेचा रंग पाण्यासारखा असतो, म्हणजे पाणी कलर. शेजवान कलर, ओरिओ कलर, काळपट हिरवा, निळसर गुलाबी. इ. नवीन रंगांची किमान ३९ नावे शोधाच.

११. तुम्ही सगळे खवय्ये आहातच. इडलीसोबत मिळणारी लाल चटणी, हिरव्या मिरचीची डाळं घातलेली चटणी आणि गनपावडर चटणी चवीला वेगवेगळीच. म्हणजे कशी हो? वेगवेगळ्या चटण्या, पाणीपुरीचं पाणी, जिलबी, मसालेभात, बिर्याणी उफ्! अशा किमान ११७ गोष्टी आपण चवीचवीने खात असतो, त्यांपैकी फक्त ३९ पदार्थ आणि त्यांच्या चवींची नाव सांगा बरं. (उदा. दुधाळ कॉफी, लसणीची चरचरीत फोडणी, हिंगुट वास पुढे आल्याने चिवडा समसमीत झालाय.)

१२. आता इतक्या पदार्थांची उजळणी केल्यावर जीभ खवळणार! भूक कडाडणार. मग खूप खाल्लं तर पोट बिघडणार. भूक लागल्यावर आणि खाऊन खाऊन पोट बिघडल्यावर, तुम्ही तुमची अवस्था सांगण्यासाठी जर वेगवेगळे ३९ शब्द वापरत असाल तर तुम्ही खरे खवय्ये! (उदा. पोटात कळमळतंय. कावळे ओरडत आहेत. पोट घुसघुसतंय. इ) आणि हो, तुमच्याकडे ३९ पेक्षा जास्त शब्द असतील तरच आम्हांला कळवा.



१३. या सुटीत कणीक मळायला शिकाच.. म्हणजे 'मळणे' याचा खरा अर्थ तुम्हांला अनुभवता येईल. तीन ते चार दिवसांच्या अथक सरावानंतर कणीक व्यवस्थित मळता येईल, पण तोपर्यंत 'कपडे मळणार नाहीत' याची काळजी घ्या.

१४. घरामधील वेगवेगळ्या वस्तूंमधील अंतर मोजण्यासाठी वेगवगेळी २६ परिमाणं वापरा. त्याचा एक चार्ट तयार करा. (उदा अंतर मोजण्यासाठी, पट्टी, काठी, ओढणी, रुमाल, घरातल्या सगळ्यांची पावलं, चमचे अशा गोष्टींचा उपयोग करा.) हे काम घरातल्या सगळ्यांनी मिळून करायचं आहे.

१५. तुम्हांला 'म' ची भाषा माहीत आहे का? उदा. तुम्हांला ममची भामषा मामहित आमहे काम? आता तुम्ही तुमची नवीन सांकेतिक भाषा तयार करा. आणि चक्क दिवसभर सगळ्यांशी याच भाषेत बोला, त्यावेळी इतरांचा होणारा गोंधळ समजून घ्या.

१६. सर्वांच्या घरात किमान ११७ काटकोन असतातच. तुमच्या घरात किती आहेत? मोजा. तुम्हांला तुमच्या घरातच लपलेले १६९ काटकोन सहजच मिळतील.

१७. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी १३ मिनिटं खिडकीत उभे राहा. १३ मिनिटांपैकी ९ मिनिटं डोळे बंद ठेवा. ऐकू येणारे आवाज लक्षात ठेवा. १३ मिनिटांत शक्यतो २७ आवाज ऐकू येतात. तुम्हांला किती ऐकू आले? ते लिहा. असं किमान तीन वेळा करा. नंतर खिडकीत जाण्याआधीच तुम्ही आवाजाचा वेध घेऊ शकाल.

१८. आज दिवसभर बोलताना घरातल्या सर्वांनी 'यमकोगिरी' करायची आहे. काही बोलताना 'यमक' वापरायचं.. अर्थपूर्ण किंवा निरर्थक.. पण यमक हवेच! घरात होणारी दे धमाल अनुभवा. (उदा. आई मला पोळी, ती पण पुरणाची पोळी. पोळीवर तूप, खूप खूप)

१९. आकाश कुठे संपतं आणि अंतरिक्ष कुठून सुरू होतं? हे शोधून काढा.

२०. ससा का चालत नाही आणि झुरळ का मागे वळत नाही? हे शोधून काढा.

२१. 'दुपारी १२ वाजता सूर्य ☀ डोक्यावर येतो' असं तुम्ही ऐकलं असेल. पण आपल्या

काश्मीरमध्ये  दुपारी १२ वाजता सूर्य डोक्यावर येतच नाही. तिथे सूर्य डोक्यावर कधी येत असेल की येतच नसेल? तुम्हांला काय वाटतं?



२२.  कणीक, रवा आणि मैदा हे गव्हापासूनच तयार करतात. तर या तिघांचे गुणधर्म एकच आहेत की वेगवेगळे? का? चला, शोधा.

२३. एक दिवस घरातला शिवणाचा डबा घेऊन 'शिवाशिवी' करा. बटण लावणे, हूक लावणे,  शिवणे, टीप किंवा धावदोरा घालणे, टाका घालणे याचा अनुभव मोठ्या माणसांसोबत घ्या.

२४. या सुटीत वेगवेगळ्या फळांच्या बिया जिथून मिळतील तिथून जमवा. साफ करून ठेवा. त्याचे वर्गीकरण करा. पावसाळ्यात सहलीला जाल तेव्हा या बिया डोंगरावर, बागेत किंवा रस्त्याच्या बाजूला रुजवण्याचा प्रयत्न करा.

२५. आपल्या परिसरात अंध, अपंग, कर्णबधिर, गतिमंद अशी काही खास मुले असतात. सुटीच्या दिवसातील काही दिवस त्यांच्यासाठी राखून ठेवा. त्यांच्याशी गप्पा मारा. त्यांना गोष्टीची पुस्तकं वाचून दाखवा. त्यांना बागेत फिरायला घेऊन जा. त्यांच्याशी खेळा. तुमच्या मदतीची नाही तर तुमच्या मैत्रीची त्यांना गरज आहे, हे लक्षात ठेवा. मला खात्री आहे त्यांच्या सहवासात तुम्हांला खूप नवीन गोष्टी कळतील.

२६. 'आई' या शब्दासाठी किमान ३९ भाषेतले शब्द शोधा. पाहून लिहा. यासाठी घरातल्यांची, शेजाऱ्यांची तसेच गुगलबाबा, चॅटजीपिटी यांची मदत घ्या.



२७. आता तुम्हांला वेगळ्या भाषेतले समानार्थी शब्द शोधण्याचा चांगला सराव झालाच आहे. आता तुम्ही तुमचे स्वतःचे नाव वेगवेगळ्या १३ भाषांत कसे लिहितात ते शोधा आणि लिहा. मग ते मित्र-मैत्रिणींना दाखवा.

२८. प्रत्येक फळ कापण्याची पद्धत वेगळी असते आणि ती प्रयत्नपूर्वक शिकावी लागते. या सुटीत आंबा, कलिंगड, पपनस, टरबूज, पपई, फणस, अननस अशी फळे वेगवेगळ्या पद्धतीने आवर्जून कापा आणि 'कापण्यातली गोडी' अनुभवा.

२९. दूध गरम करणे, उकळणे, आटवणे, नासवणे, अती थंड करणे, विरजणे, पावडर करणे यांचे खूप फायदे आहेत. ते कोणते? दूध वापरून केलेल्या पदार्थाची एक रेसिपी सांगा पाहू.

३०. हे वेगवेगळे १३ पदार्थ कशा-कशापासून तयार होतात : डोसा, इमरती, केक, सोलकढी, उंधियो,  सुतरफेणी, पेठा, बकलावा, संदेश, पास्ता, जॅम, बटरस्कॉच आइसक्रीम, मणगणे.

३१. आईच्या आणि बाबांच्या मदतीने “आमच्या खास रेसीपी” असे तुमच्या कुटुंबाचे चमचमीत रेसिपी पुस्तक तयार करा. या पुस्तकातील पदार्थांचे फोटो, रेसीपी आणि पदार्थांची वर्णनं अशी लिहा की, शेजाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटलं पाहिजे. मग फोटो अपलोड करून त्याचे इ-बुक करा. ते सगळ्यांना सेंड करा. वाचणाऱ्यांच्या जिभा खवळल्या पाहिजेत.

३२. सेल्फी काढा पाच बोटांनी : एखाद्या दिवशी दुपारी जेवण झाल्यावर घरातल्या आरशासमोर खुर्ची घेऊन बसा. थोडावेळ निवांतपणे स्वतःला पाहा. स्वतः कडे पाहा. मग आरशात पाहून स्वतः चेच मस्त चित्र काढा. चित्राखाली नाव न लिहिता ‘चित्रातील व्यक्ती’ तुमच्या घरातल्यांना, शेजारच्यांना किंवा तुमच्या मित्रमैत्रिणींना ओळखता येते का पाहा.

३३. घराजवळील किराणामालाचे दुकान, औषधाचे दुकान, दवाखाना, डेअरी अशा कुठल्याही ठिकाणी दिवसांतून एक तास मदत करण्यासाठी जाता येईल. यासाठी घरातील मोठ्या माणसांच्या मदतीने प्रयत्न करा. खूप वेगळं पाहण्याचा आणि शिकण्याचा जाणीवपूर्वक अनुभव घ्याच.

३४. आठवड्यातून एक दिवस किमान एक वेळ तरी स्वयंपाकघरात काम करायचेच आहे. मग होणाऱ्या गमती आम्हांला कळवायच्या आहेत.



३५. रोज घरासमोर वेगळे सुशोभन करा. सुशोभन करण्यासाठी टाकाऊ वस्तूंचाच वापर करा. सुशोभन करण्याच्या विविध पद्धती आहेत. घरासमोर एखाद्या फरशीवर किंवा मातीत कुठलेही एक चित्र काढा/ आकृती काढा / ठिपक्यांची रांगोळी काढा. त्यात रंग न भरता त्यात टाकाऊ वस्तूंचा उपयोग करा. उदा. बांगड्यांच्या काचा, फळांच्या साली, रंगीत कागदांचे तुकडे, निर्माल्य, रानटी फुले, सुक्या फुलांचा चुरा, गवत, बिया, रंगीबेरंगी चिंध्या, शेंगांची टरफले, प्लास्टीकचे तुकडे, चहाचा चोथा इ. हे फोटो आम्हांला इ-मेलने पाठवा.

३६. विज्ञानाचे सोपे प्रयोग समजावून सांगणारी अनेक पुस्तके आता बाजारात किंवा वाचनालयात उपलब्ध आहेत. ती मिळवा. किंवा नेटवर **www.arvindguptatoys.com** ही साइट पाहा. इथे विज्ञानाचे हजारो प्रयोग आहेत. हे सोपे प्रयोग स्वतःहून करा. त्यातील मजा अनुभवा.

३७. ज्या दुकानात पंखा, इस्त्री, मिक्सर दुरुस्त करतात अशा दुकानात जा. दुकानदाराच्या परवानगीने दुकानात सुरू असणाऱ्या कामाचे ‘शांतपणे’ निरीक्षण करा. मग दुकानदाराच्या सोयीच्या वेळात त्यांची परवानगी घेऊन त्यांना प्रश्न विचारून नवीन गोष्टी शिकून घ्या.

३८. तुमच्या जवळच्या मित्रांना एका संध्याकाळी घरी बोलवा. कुणी काय करायचे याचे नियोजन करून, सर्वांनी मिळून चटकदार ओली भेळ करा आणि तुमच्या पालकांना खिलवा. ही ‘खिलवा खिलवी’ मग सर्वच मित्रांच्या घरी करा.

३९. गाजर, काकडी, मुळा, टॉमेटो, बीट किंवा कोबी यांची कोशिंबीर करणं तुम्हांला सहज जमू शकतं. आठवड्यातून दोनदा अवश्य करा. घरातलेच काय शेजारीसुद्धा आनंदाने खातील.



खरं म्हणजे तुम्हांला रोज एक गोष्ट करता यावी, असा विचार करून मी तुम्हांला ५२ गोष्टी सांगणार होतो. पण मी अचानक विचार बदलला. याची दोन कारणं आहेत. एक म्हणजे, या जरी ३९ गोष्टी असल्या तरी त्या काही रोज फक्त एकच करायची गोष्ट नाही. यासाठी नक्कीच तुम्हांला जास्ती दिवस लागतील. आणि दुसरं म्हणजे सगळ्या गोष्टी मीच का सांगाव्यात? 'तुम्ही सर्जनशील आहात' यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तुम्ही आणखी भन्नाट गोष्टी शोधून काढा. नवनवीन गोष्टी करून पाहा, शिका आणि एन्जॉय करा... आणि हे सारं मलाही कळवा. मी तुमच्या 'सर्जनशील एन्जॉयमेंट' पत्रांची वाट पाहतोय.

**-राजीव तांबे**
*rajcopper@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*

## वेचक-रोचक

**वैशाख** शुक्ल तृतीया म्हणजेच अक्षय्य तृतीया. 'अक्षय' म्हणजे कधीही न संपणारे. 'अक्षय्य तृतीया' हा शुभ दिवस मानला जातो. याबाबत बऱ्याच आख्यायिका आपल्या परंपरेमध्ये प्रचलित आहेत. जसे की, त्रेतायुगाच्या प्रारंभी या दिवशी गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली. त्यामुळे पाण्यामुळे येणारी संपन्नताही आली.



वेद व्यासांनी महाभारत रचायला या दिवशीच सुरुवात केली असे म्हटले जाते. महाभारतातच युधिष्ठिराला 'अक्षयपात्र' याच दिवशी मिळाले असा उल्लेख आहे. अक्षयपात्राचे वैशिष्ट्य म्हणजे या पात्रातील अन्न कधीही संपत नसे. यामुळे युधिष्ठिराने अनेक गरजूंची भूक भागवली असे उल्लेख आहेत.

काही घरांत हातात पळी असलेली अन्नपूर्णा असते. या देवीचा वाढदिवस अक्षय्य तृतीयेच्या दिवशी असतो. साधारणतः अक्षय्य तृतीयेपासून, कडकडीत उन्हात धान्य वाळवून वर्षभराची बेगमी करण्याची तयारी सुरू होते. अन्नधान्य जपून वापरणे, उन्हात वाळवून ते टिकवणे, ही आपली संस्कृती आहे.

# ससा हरला त्याची गोष्ट

**गोष्ट** तशी जुनीच आहे. सशाची नि कासवाची. त्यांच्यात लागलेल्या धावण्याच्या स्पर्धेची. सावकाश, पण सातत्याने चालण्याची. कासव सरतेशेवटी कसे शर्यत जिंकले आणि सशाला आपला आळस किंवा आत्मविश्वास कसा नडला, त्याची ही गोष्ट.

कासवावरून खलील जिब्रानची कविता आठवते-

***'सशापेक्षा कासवालाच अधिक माहीत असतात***
***खाच-खळगे आणि खूपखूप रस्ते आणि त्यावरील वळणे.'***



चित्र- अदिती पाध्ये-देसाई

हळूहळू चालणारे कासव जमिनीच्या खूप जवळ असते. आणि आपल्या बारीक डोळ्यांनी ते सभोवताल आपल्या नजरेत साठवत असते. त्याला आपल्या मर्यादांची जाणीव असते, त्यामुळे ते सावध राहून रस्त्यावरील खाचखळगे नि अवघड वळणे यांकडे लक्ष देते.

ससा-कासवाच्या गोष्टीची आठवण काढताच माझ्या स्वप्नात तो ससा आला. टुणकन् उडी मारून पुढ्यात बसला.

मी म्हटले, "तू हरलास कसा, याचे आम्हांला अजूनही आश्चर्य वाटते.."

"सांगतो, ऐक," तो बोलायला लागला, आणि मी कान टवकारले.

ससा म्हणाला, "मी मुळीच आळशी नव्हतो, की आत्मसंतुष्ट नव्हतो. वाटेतल्या डोंगरकड्यावरील कुरणातून जात होतो. तिथून लांबवर नजर टाकली. कासवाचा कुठे मागमूस नव्हता. त्या मूर्ख कासवाने मला धमकी दिली होती की, सतत चालत राहून मी नक्कीच शर्यत जिंकीन. मला त्याला दाखवायचं होतं की मी खूप जलद गतीने, जास्त अंतर पार पाडू शकतो. पण त्या कुरणातील वृक्षराजीतून वाऱ्याची झुळूक येत होती. एक झरा झुळूझुळू वाहात होता. तिथलं वातावरण किती मस्त होतं! मी तो अनुभव घेत पहुडलो.

तिथल्या एका दगडावर एक म्हातारा बसला होता. त्याने मला विचारलं, "इथे काय करतो आहेस तू?"

"मी एका शर्यतीत भाग घेतला आहे."

"कशाला?"

"जंगलातील सर्व प्राण्यांमध्ये मी जलद धावणारा आहे, हे सिद्ध करण्यासाठी."

"तुला तसं सिद्ध का करावंसं वाटतंय?"

"तसं केल्याने मला मेडल मिळेल. मला मानमरातब मिळेल. लोकांनी मला सर्वांत जलद धावणारा ससा म्हणून ओळखायला हवं."

"आज तुला कासवाने आव्हान दिलंय, उद्या एखादा साप देईल. नंतर एखादा झेब्रा देईल. आयुष्यभर तू शर्यतीत भाग घेऊन तू 'जलद धावणारा' हे सिद्ध करीत राहशील?"

"अरे! मी याचा विचारच केला नव्हता. मला सारं आयुष्य शर्यतीत घालवायचं नाहीये. "

"मग तुला नेमकं काय करायचं आहे?"

"मला पिंपळाच्या झाडाखाली बसायचं आहे. खाली पडलेल्या पानांच्या गादीवर झुलायचं आहे. मधमाशांचं कुंजन ऐकायचं आहे."

"ते तर तू आतासुद्धा करू शकतोस. कुठली शर्यत अन् कुठलं काय? आज तू आहेस, उद्या नाहीस."

त्याच्या बोलण्याने माझे डोळे उघडले. बाजूचे तळे सुंदर दिसत होते. मी तळ्यात उडी मारली. इथे तिथे हुंदडलो.

"अरे, तू तर शर्यतीत भाग घेतला होतास, ना? तरी अशी मौजमजा करत राहिलास?"

त्या स्पर्धेला काही अर्थ नाही, हे मला कळले. जगण्याच्या स्पर्धेत, मुक्कामाला पोचण्यापेक्षा आनंददायी प्रवास महत्त्वाचा! तो घेतला मी. भलत्या स्पर्धेत उतरायचं नाही, असं ठरवलं मी. कधीतरी कुणीतरी जगाला माझी बाजू सांगेल. मी आज शर्यत हरलो, पण जीवनाची शर्यत मी जिंकलो, असं वाटलं मला!

**-जोसेफ तुस्कानो**

*haiku_joe_123@yahoo.co.in*



# ‘पुष्पक’ची भरारी

**आपण** प्रवासाला निघतो. त्यासाठी मोटर, आगगाडी, विमान असं कोणतंतरी वाहन वापरतो. मुक्कामाला पोचल्यावर आपण ते वाहन तिथेच टाकून देत नाही. ते परत मूळ ठिकाणी आणलं जातं. परत परत वापरता येतं.

अंतराळप्रवासात मात्र परिस्थिती वेगळी आहे. उपग्रहाला अंतराळातल्या त्याच्या नियोजित ठिकाणी वाहून नेणारा अग्निबाण प्रक्षेपक त्याचं वाहन असतो. हा तीन किंवा चार टप्प्यांचा बनलेला असतो. त्यातले पहिले दोन-तीन टप्पे पुढच्या टप्प्याला ढुशी देत वाटेतच गळून पडतात; जळून जातात. शेवटचा टप्पा मुक्कामापर्यंत पोचतो खरा, मात्र त्यालाही तिथेच सोडून द्यावं लागतं. त्याच्यातच त्या संपूर्ण अंतराळस्वारीचं संचालन करणारी किमती इलेक्ट्रॉनिक यंत्रणा असते. ती एकदाच वापरता येते. वरचेवर प्रवास करायचा तर हा आतबट्ट्याचाच व्यवहार झाला. शिवाय त्या यंत्रणेचं ओझं सतत बाळगावं लागल्यामुळे त्या अग्निबाण प्रक्षेपकाचं वजनही वाढतं. साहजिकच, अधिक इंधनाची गरज निर्माण होते. ती एकंदरीत खर्चात वाढच करते. आजमितीला एक टन वजनाच्या उपग्रह-प्रक्षेपणासाठी दहा ते पंधरा लाख रुपये खर्च येतो.

अवकाशातून परत धरतीवर आणता येईल आणि पुनर्वापर करता येईल, असे प्रक्षेपक वाहन, म्हणजे Reusable launch vehicle (RLV) 'इस्रो'ने तयार केले आहे. या स्वदेशी तंत्रज्ञानामुळे अंतराळप्रवासाचा खर्च चांगलाच कमी होणार आहे. या वाहनाचे नाव 'पुष्पक'. याला विमानाचा आकार दिला गेला असला, तरी हे विमान नाही, आहे रॉकेटच!

अंतराळप्रवास परवडणारा करायचा असेल, तर हाच खर्च तीस-चाळीस हजारांच्या मर्यादेत आणायला हवा.

ते साध्य करण्यासाठीच आपल्या अंतराळ संशोधन संस्थेने, इस्रोने, अवकाशात सोडून न देता जे परत धरतीवर आणता येईल आणि ज्याचा पुनर्वापर करता येईल असं प्रक्षेपक वाहन तयार करण्याचा चंग बांधला आहे. अर्थात त्यासाठी अनेक नव्या तंत्रज्ञानाचा विकास करावा लागणार आहे; त्यातली तीन तंत्रज्ञानं कळीची आहेत.

पहिलं तंत्रज्ञान आहे, या अग्निबाणासाठी अनोख्या प्रकारचं इंजिन बनवण्याचं. इंजिनामध्ये इंधन कोणतंही असो, त्याच्या ज्वलनासाठी ऑक्सिजन अत्यावश्यक असतो. तो नसेल तर इंधनाचं ज्वलन होणारच नाही, अग्निबाणाला गती मिळणारच नाही. इंजिन बंदिस्त असल्यामुळे तो ऑक्सिजनही त्याला आपल्याबरोबर वाहून न्यावा लागतो. त्याचं ओझंही होतंच.

ते टाळण्यासाठी 'स्क्रॅमजेट इंजिन' असं बारसं केलेल्या एका आगळ्यावेगळ्या इंजिनाची निर्मिती करण्यात आली आहे. ते त्या इंजिनाच्या भन्नाट वेगाच्या मदतीनं आत येणाऱ्या हवेला दाबून ऑक्सिजन उपलब्ध करून देतं. त्यामुळे उड्डाणाच्या वेळचं अग्निबाणाचं वजन कमी होतं. या इंजिनात इंधन म्हणून द्रवरूप हैड्रोजन वापरलं होतं आणि हवेतून मिळवलेल्या ऑक्सिजनचा वापर केला होता. त्याची पहिली चाचणी आठ वर्षांपूर्वीच श्रीहरीकोटा इथे घेतली गेली आहे. ३०० सेकंदांचा प्रवास करून ते बंगालच्या उपसागरात साडेतीनशे किलोमीटर अंतरावरच्या आभासी तळावर सुखरूप उतरलं. अशा प्रकारे कठोर अग्निपरीक्षेतून ते तावून सुलाखून पार पडलं आहे.

दुसरी डोकेदुखी आहे, ती अशा प्रकारच्या वाहनाच्या पृथ्वीच्या वातावरणातल्या प्रवासाची. परतीच्या प्रवासात जेव्हा ते त्या वातावरणात शिरतं, त्यावेळी त्याचं तिथल्या हवेशी घर्षण होतं. त्याचा वेगही तुफान असल्यामुळे घर्षणापायी प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होते. ती त्या अग्निबाणाला सहन होत नाही. जवळ जवळ ५ ते ६ हजार अंश सेल्सियसपर्यंत पोचलेल्या त्या तापमानात त्याचं धातूचं बाहेरचं आवरण लालबुंद होतं. ते वितळू लागतं, जळू लागतं आणि भस्मसात होतं. त्याचाही बंदोबस्त करायचा होता.

त्यासाठी सिलिकापासून बनवलेल्या उष्णतारोधक टाइल्सची निर्मिती करून त्यांचं वाहनाभवती कवच घालून संरक्षण करणं आवश्यक होतं. अशा पदार्थाचा अंगरखा वापरलेलं यान २०१६च्या मे महिन्यात ६५ किलोमीटर उंचीवर नेऊन त्याला परत आणण्यात आलं. ते आवाजाच्या वेगापेक्षा जास्त वेगाने धरतीच्या वातावरणात शिरलं. पण उष्णतेचा कोणताही त्रास न होता अंतराळतळावर ते अखंड उतरलं. तरीही त्या यानाचं जणू नाक असलेल्या पुढच्या कोनाकृती भागाला त्या उष्णतेचा जबरदस्त तडाखा सहन करावा



लागतो, हे त्याच वेळी ध्यानात आलं. त्याचा बचाव करण्यासाठी कार्बनच्या धाग्यांपासून विणलेला कॉम्पोझिट प्रकारचा पदार्थ खास तयार केला गेला. त्याचा लेप त्या नाकावर चढवण्यात आला.

खरी कसोटी होती ती तिसऱ्या समस्येची. उड्डाण करताना त्या अग्निबाणाचं नियंत्रण जमिनीवरच्या केंद्रातून करता येतं. म्हणूनच तर उपग्रहाला त्याच्या नियोजित ठिकाणावर स्थापन करताना त्याच्या वेगात, दिशेत जे काही बदल करावे लागतात, त्यासाठीच्या आज्ञा नियंत्रण केंद्राकडून दिल्या जातात. परतीच्या प्रवासात तो अग्निबाण स्वतंत्र असतो. त्यात जेव्हा ते धरतीच्या प्रभाव क्षेत्रात प्रवेश करतं त्यावेळी ते जवळजवळ ९० अंशाच्या कोनातून म्हणजे जमिनीला काटकोनात येत असतं. विमानतळावर उतरतं त्यावेळी ते समांतर असतं. त्याच्या दिशेमध्ये त्यामुळे हळूहळू बदल करावे लागतात; त्याचं त्यालाच आपल्या या जटिल प्रवासाचं नियंत्रण करून इच्छित स्थळी पोचायचं असतं. विमानांचं सारथ्यावाचून ऑटोमॅटिक लॅन्डिन्ग करतात, त्याच प्रकारचं हे अवतरण आहे. अर्थात त्यासाठी विमानापेक्षा अधिक गुंतागुंतीची आणि अत्याधुनिक यंत्रणा त्या प्रक्षेपकात अंतर्भूत करावी लागते.

अशा प्रकारची जय्यत तयारी केलेल्या अनोख्या प्रक्षेपकाची उड्डाण चाचणी गेल्या २२ मार्चला घेण्यात आली. या प्रक्षेपकाचं 'पुष्पक' असं बारसं करण्यात आलं आहे. हे रामायणातल्या पुष्पकासारखं विमान नाही, अवकाश-प्रक्षेपकच आहे. अर्थात त्याला विमानाचा आकार दिला गेला आहे आणि त्याच्यासारखे दोन पंखही आहेत. हवाईदलाच्या 'चिनुक' श्रेणीतल्या हेलिकॉप्टरने पुष्पकला आपल्या पकडीत घेत आकाशात नेलं. सायकल शिकवताना शिक्षक जसा एका क्षणी आपला हात काढून घेत नवशिक्याला स्वतंत्र करतो, तशाच प्रकारे पुष्पकला स्वबळावर सोडून दिलं गेलं.

पुष्पक जेव्हा विमानतळावर उतरायला लागेल तेव्हा पर्यावरणाची स्थिती नेहमीच अनुकूल असेल असं नाही. अशा वेळी त्या प्रतिकूल घटकांची दखल घेत आवश्यक त्या सुधारणा आपल्या प्रवासाच्या मार्गात करायची क्षमता पुष्पककडे आहे की काय, याचीही चाचणी घेण्यासाठी जाणूनबुजून काही कमतरता ठेवण्यात आल्या होत्या. पण पुष्पकने त्यांना दाद न देता, आपलं अवतरण यशस्वी करून दाखवलं आहे. ताशी साडेतीनशे किलोमीटरपर्यंतचा वेग सहन करण्याची ताकद पुष्पककडे आहे.

जमिनीवरच्या प्रवासात आजकाल जीपीएस यंत्रणेची मदत मिळते. त्यामुळे पूर्वी कधीही न गेलेल्या अनोळखी ठिकाणी पोचण्याची वाटही दाखवली जाते. तशाच प्रकारची पण अंतराळात उपयोगी ठरणारी नॅव्हिगेशन प्रणाली विकसित केली गेली आहे. तसंच जमिनीपासूनची उंची अचूकपणे

मोजण्यासाठी अतिसंवेदनशील यंत्रणेचाही वापर केला गेला आहे. आपल्याकडे झेपावणारं विमान किती अंतरावर आहे हे मोजण्यासाठी जसा रडारचा उपयोग होतो, त्याच धर्तीवरची ही यंत्रणा आहे.

विमान जेव्हा जमिनीवर उतरतं, तेव्हा त्याची रबराची चाकं त्याच्या पोटातून बाहेर पडतात. त्यांना लॅन्डिंग गियर म्हणतात. तशाच धाटणीचा, पण पुष्पकला साजेसा लॅन्डिंग गियरही त्याला बसवण्यात आला आहे. शिवाय उतरताना ते अलगद यावं, त्याचा वेग कमी होत जावा, यासाठी पॅराशूटसारखं काम करणाऱ्या ब्रेकचीही योजना केली गेली आहे.

या आत्मनिर्भर तंत्रज्ञान निर्मितीपायी अंतराळप्रवासाच्या खर्चात तब्बल ८० टक्के बचत होणार आहे. मंगळयानाच्या वेळेस, आपण त्याच सुमारास धाडल्या गेलेल्या अमेरिकी यानाच्या एक तृतीयांश खर्चात ती मोहीम कशी आखली, याचं आश्चर्य जगाला वाटलं होतं. पण इस्रो ही किमया कशी साध्य करतं, याचंही दर्शन पुष्पकनं घडवलं आहे.

पुष्पकच्या निमित्ताने इस्रोने 'स्वदेशी स्पेस शटल'च तयार केली आहे. अंतराळसंशोधन कार्यक्रमाला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवलं आहे.

**-डॉ. बाळ फोंडके**
*dr. balphondke@gmail.com*
*(ज्येष्ठ वैज्ञानिक व विज्ञान लेखक)*

# DOODLE AWAY!

**Fill the leaf given below with your own doodles and colours!**

**-Vaishanvi Mahimkar**
*mahimkarvaishnavi@gmail.com*



# सुरकुत्यांची शिकवण

**संपूर्ण** दोन वर्षं घरूनच ऑनलाइन शाळा सुरू होती. इतर अनेक मित्रांप्रमाणे दोन वर्षं कशी सरली ते राजालाही कळलं नाही. जेव्हा ‘कोविड’ची भयभीत करणारी लाट आली, तेव्हा सगळ्याच गोष्टी विस्कटल्या होत्या.

राजा आता तिसरीत गेला होता. त्याचं पहिली-दुसरीचं शिक्षण ऑनलाइनच झालं होतं. तो प्ले स्कूलमध्ये आणि किंडरगार्टनमध्ये जात होता. पूर्णवेळ शाळेत तो कधी गेलाच नव्हता. त्यामुळे शाळा म्हणजे काय याबद्दल तो अनभिज्ञच होता. शेजारचा बिट्टूभय्या पाचवीत गेला होता.

ऑनलाइन शाळेची सुरुवातीला वाटणारी गंमत ओसरली आणि तो अनुभव कंटाळवाणा होऊ लागला. कधी वीज खंडित होत असे. टीचर पुन्हा विद्यार्थ्यांना व्हिडिओ चालू करायला सांगत असे. सुरुवातीला ‘अंघोळ केली का?’ ‘नाश्ता घेतला का?’ असे प्रश्न त्या विचारायच्या. टीचरच्या कपाळावरच्या आठ्यांवर ती वाक्यं लिहिलेली असत. शिक्षिका दुःखी असावी, असं त्याला वाटे. पण मम्मीदेखील दुःखी दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरही दुःखाच्या रेषा दिसत होत्या. विशेषतः कोविडच्या दुसऱ्या लाटेत डॅडींनी इस्पितळातूनच जगाचा निरोप घेतला तेव्हापासून.

आता शाळा सुरू झाली होती. आता आपल्याला दुःखी रेषा आवडत नसल्याचं त्याच्या लक्षात आलं होतं. एकदा त्या सुरकुत्यांबद्दल कोणीतरी थट्टा केली होती. तिसरीचा वर्ग सुरू होऊन एक आठवडा उलटला होता. तो खरं म्हणजे शाळेचा नवा गणवेष घालून मम्मीला बाय करून शाळेत जाणार होता. घरी आल्यावर जेवणार होता. पण आता डॅडी नव्हते. म्हातारी आजी बाल्कनीत दिवसभर आपल्या गेलेल्या मुलाचा विचार करत बसलेली असे. राजाला आता आणखी कोणाला त्रास देऊन दुःखी करण्याची इच्छा नव्हती. तसंच कपाळावर आणखी आठ्या पडायला नकोत, असं त्याला वाटत होतं. मात्र त्याला कशाची चिंता वाटते, ते त्याने कोणालाच सांगितलं नव्हतं. नाहीतर त्याच्याही कपाळावर रेषा दिसू लागतील अशी भीती त्याला वाटत होती. त्याने त्याचा चेहरा आरशात पाहिला. तिथे दुःखाच्या आठ्या उमटलेल्या होत्या. मात्र याबद्दल तो मम्मीशी किंवा आजीशी बोलणार नव्हता.

वडील गेल्यापासून घरात कोणत्याच नव्या वस्तूची खरेदी केली गेली नव्हती. खरं म्हणजे नवा छान गणवेष परिधान करून वर्गात उठून दिसावं अशी त्याची खूप इच्छा होती. परंतु बिट्टूच्या आईने बिट्टूच्या जुन्या गणवेषाचे दोन संच आणून दिले होते. ते जुने गणवेष वापरण्यात तो समाधान मानून घेत होता. त्यांच्याकडे फार पैसे नव्हते. मम्मीने त्याला तसं कधी सांगितलं नव्हतं. पण त्याला ते कळून चुकलं होतं. दिवसभर शाळेत वापरलेले कपडे घरी आल्यावर तो लाँड्री बॅगेत फेकून देत असे. आई ते नंतर धुऊन

दांडीवरचे कपडे सुकल्यावर तसेच अंगावर चढवून तो शाळेत जायचा. कपड्यावरच्या सुरकुत्या त्याला अस्वस्थ करत; कपाळावरच्या दुःखी रेषांची आठवण करून देत.



चित्र - अदिती पाध्ये-देसाई

वाळत घाली. मात्र दुसऱ्या दिवशी दांडीवरचे कपडे अंगावर चढवले की, त्यावर सुरकुत्या दिसत असत. त्या पाहून त्याला कपाळावरच्या दुःखी रेषांची आठवण होत असे. काही मुलं त्याला चिडवत असत. “राजा, तुझे कपडे किती चुरगळलेले आहेत.”

राजाला हे बोलणं बिलकूल आवडत नसे. डॅडी कसे ऑफिसला जाताना नीटनेटके कपडे घालून जात असत, याची त्याला आठवण झाली. डॅडी जिन्याखालच्या इस्त्रीवाल्याकडे इस्त्रीसाठी कपडे देत असत.

दुसऱ्या दिवशी राजाने मम्मी आणि आजी यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता आपले कपडे स्वतःच धुण्यास सुरुवात केली. पण ते काम त्याला फारसं जमत नव्हतं. आईला आपण मदत करतो असं दाखवण्याचा त्याचा प्रयत्न होता. मम्मीने त्याच्या बोलण्यावर फक्त स्मितहास्य केलं. आणि काय घडलं? मम्मीच्या कपाळावरच्या निराशेच्या रेषा कमी झाल्या असं त्याला जाणवलं. तो म्हणाला, हसल्यावर तुझ्या चेहऱ्यावरची निराशा कमी झाली. धावत जाऊन त्यानं आपला चेहरा आरशात पाहिला. पण त्याच्या कपाळावरच्या



आठ्या तशाच होत्या. तुम्ही मनापासून हसलात तर तुमच्या कपाळावरच्या रेषा नाहीशा होतात. तुमचं हसणं खोटंखोटं असलं तर त्या रेषा गायब होत नाहीत.

स्वतः कपडे धुण्यामुळे निराशा काही जात नव्हती. नंतर तो आपले कपडे वाळल्यावर व्यवस्थित घडी घालून ठेवू लागला. त्यामुळे तरी सुरकुत्या जातील असं त्याला वाटत होतं. पण तसं घडलं नाही. हाही प्रयत्न यशस्वी होत नसल्याचं त्याला कळून चुकलं. आरशात पाहिल्यावर चेहऱ्यावर नाराजीची एखादी रेषा अधिकच उमटल्याचं त्याला जाणवलं. आरशाला नाक टेकवून त्याने पुन्हा एकदा आपला चेहरा पाहिला. आज आणखी तीन मुलांनी त्याला चुरगळलेल्या आणि जुन्या गणवेशावरून चिडवलं. त्या कपड्यांमुळे वर्गात तो उठून दिसू शकत नव्हता. आपल्या इमारतीतल्या वॉचमनला त्याने इस्त्रीबद्दल विचारलं, तेव्हा तो म्हणाला, 'एका कपड्याला आठ रु. पडतील. म्हणजे एका दिवसाचे १६ रुपये होतील.' हे परवडणारं नाही हे लक्षात आल्यावर तो विचार त्यानं दूर सारला.

आता काय करावं या विचारात तो एका जागी बसून होता. मम्मी काही कामासाठी बाहेर गेली होती. कितीतरी दिवसांत ती बाजारात गेलेलीच नव्हती. खरं म्हणजे डॅडी गेल्यापासून ती फारशी बाहेर जातच नाही. मम्मीला सध्या काहीतरी काम मिळालंय. त्याची शाळा सुरू झालीय. जीवन हळूहळू रुळावर येऊ लागलंय. गणवेषाचा चुरगळलेपणा या बाबी क्षुल्लक आहेत. त्याची थट्टा करणाऱ्या मुलांना या सगळ्या गोष्टी माहीत नाहीत, म्हणून ती अशी प्रतिक्रिया व्यक्त करत असावीत. अशी त्याने आपल्या मनाची समजूत घातली.

मम्मीला त्रास न देता यावर काहीतरी उपाय शोधून काढायला हवा असं त्याला वाटू लागलं. आपण जबाबदारीनं वागून मम्मीला मदत केली पाहिजे असा विचार त्याच्या मनात येऊ लागला. कपड्यांच्या सुरकुत्यांबाबत तिला त्रास देणं बरोबर नाही. तिच्या कपाळावरच्या नाराजीच्या रेषा वाढतील. आजीच्या शरीरावरच्या वाढत्या सुरकुत्यांकडेही आपण लक्ष द्यायचं नाही असं त्यानं ठरवून टाकलं आणि तो स्वतःशीच हसला.

कपडे व्यवस्थित घडी घालून गादीखाली ठेवले की, दुसऱ्या दिवशी ते छान इस्त्री केल्यासारखे दिसतात हे त्याच्या लक्षात आलं. तो धावतच आरशासमोर गेला. कपाळावरच्या रेषा त्याला नाहीशा झालेल्या दिसल्या. अशा कपड्यात तो मजेत शाळेत जाऊ लागला.

एक दिवस मम्मी बाजारातून दोन भरलेल्या पिशव्या घेऊन घरी आली. त्याने धावत जाऊन तिला ग्लासभर पाणी आणून दिलं. "आज माझा राजा का बरं खुशीत आहे?" आईने विचारलं. लगेच ती म्हणाली, "आज मी तुझ्या-माझ्यासाठी काहीतरी आणलं आहे.." असं म्हणून तिने नवी कोरी इस्त्री पिशवीतून बाहेर काढली.

राजा तिच्याकडे बघत असतानाच तिने त्याच्याकडे प्रेमानं पाहिलं आणि त्याला जवळ घेत म्हणाली, "गेले काही दिवस तुझा कपडे नीटनेटके ठेवण्यासाठी चाललेला आटापिटा मी पाहत होते. मला तुझा खूप अभिमान वाटला." राजा इतका समजूतदार मुलगा झाला होता की, त्याने कधीही मम्मीकडे काही मागितलं नाही वा हट्ट केला नाही. आता कपड्यांवरच्या सुरकुत्या घालवणारी इस्त्री त्याच्याकडे होती. राजा निरागसपणे म्हणाला, "आता आपल्या कपाळावरच्या निराशेच्या रेषाही नाहीशा होतील."

आजीच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरच्या रेषाही स्मित करू लागल्या. आजीच्या चेहऱ्यावरही आनंद

दिसला. ती ओठाने काही प्रार्थना पुटपुटू लागली. मम्मीनेही यापुढे नाराजी कमी करायची ठरवलं. तिच्याही कपाळावरच्या निराशेच्या रेषा निघून गेल्या; चेहऱ्यावर हास्य उमटलं. हेच तर राजाला हवं होतं.

*सुमकल्याणी गन्ती या लेखिकेच्या 'ब्युटी ऑफ रिंकल्स' या गोष्टीचा हा अनुवाद. ही गोष्ट 'Esperanza' या विशाखा नवरे यांनी संपादित केलेल्या पुस्तकातून घेतली आहे. 'इन्कफेदर्स' ह्या नवी दिल्लीच्या प्रकाशनसंस्थेने हे पुस्तक (प्रथम आवृत्ती) २०२३ मध्ये प्रकाशित केलं आहे.*

**अनुवाद : वासंती फडके**
*phadkevasanti4236@yahoo.co.in*



**Solve this Maze**

**-Aradhya Naik**
*aradhyanaik8@gmail.com*

# कुटुंब रमलंय वाचनात!



**आमचा** दोघांचा त्या दिवशी वाचण्याचा मूड होता. ओजसची तर वाचण्यात तंद्री लागलीच होती. एकदा, दोनदा, तीनदा हाक मारल्यावर त्याने दचकून 'ओ' दिली. आम्हा दोघांना गंमत वाटली. त्याला म्हटलं, "अरे, आम्हांलापण वाचून दाखव ना!"

"थांब गं मम्मा, आधी मी वाचून घेतो, मग तुम्हांला वाचून दाखवतो."

ओजसचं पुस्तक वाचून झाल्यावर त्याने आम्हांला हाक मारली. आम्ही उत्साहाने लगेच त्याच्या शेजारी जाऊन बसलो. ओजसने सुरुवात केली, "गोष्टीचं नाव आहे 'आपला जॉन'- लेखक वॅरॉनिक."

त्यानंतर पुढची काही मिनिटं आम्ही एका वेगळ्याच जगात हरवलो. गोष्टीतलं प्रत्येक पात्र ओजसने त्याच्या वाचनातून, आवाजातल्या चढउतारांमधून जिवंत केलं होतं. गोष्ट संपली तेव्हा दोन क्षण आम्ही काही व्यक्तच होऊ शकलो नाही.

ओजस जेव्हा गोष्ट वाचून दाखवत होता, तेव्हा ती ध्वनिमुद्रित करायची असं मला किंवा त्याच्या पप्पाला सुचलं नाही. पण, एकदा गोष्टीच्या जगातून बाहेर पडल्यावर मात्र वाटलं की, त्याच्या वाचनाचा नमुना रेकॉर्ड करायला हवा होता. मी त्याला विचारलं, "ओजू, तू हीच गोष्ट पुन्हा वाचशील? ती रेकॉर्ड करून सर्व मैत्रिणींना ऐकायला पाठवावी म्हणते. त्यांना खूप आवडेल रे ऐकायला."

त्याच्यासाठी ही गोष्ट पुन्हा वाचणं म्हणजे खरं तर लागोपाठ तिसऱ्यांदा वाचणं होतं. त्यामुळे तो चिडचिड करेल असं वाटत होतं. तो चिडला नाही, पण थोडासा वैतागलाच.

"नको ना रे मम्मा." ओजसने म्हटल्यावर मी ड्रामेबाज आईप्रमाणे तोंड एवढंसं, अगदी रडवेलं केलं. मग, तो हसायला लागला. माझी समजूत काढत म्हणाला, "एवढं नाटक करायला नकोय हं मम्मू, मी वाचेन, पण जरा नंतर."

यावेळी ओजसने गोष्ट वाचताना त्यातल्या प्रत्येक पक्ष्याला निरनिराळा आवाज दिला होता- त्याचा आकार, रंग, स्वभाव-वैशिष्ट्य लक्षात घेऊन! ती गोष्ट मी काहींना ऐकायला पाठवली. सर्वांनाच ती खूप आवडली.

ओजस आम्हांला 'चिकूपिकू' मासिक आणि

पुस्तकं वाचून दाखवतो. त्यातल्या गोष्टी, गमतीजमती, चित्र, शब्दांची गंमत आम्हांला उलगडून सांगतो. पुस्तक न वाचणारी मुलगी, वेणूच्या गोष्टी, हरवलेल्या खेळण्यांचे राज्य, जेरोनिमोच्या मालिकेतल्या काही गोष्टी, हिरवळ, पिशीमावशी नि तिची भुतावळ अशी कितीतरी पुस्तकं त्याने आम्हांला वाचून दाखवली आहेत. कधीकधी त्याला वाचण्याचा खूपच मूड असला की, तो एकटाच शांतपणे वाचत बसलेला असतो. आम्हांला स्पष्टपणे "नाही वाचून दाखवू शकत" असं सांगून टाकतो. मग, आम्हीही त्याला सतावत नाही.

तुम्हांला प्रश्न पडला असेल की मुळात, आम्ही त्याला वाचून दाखवायला का सांगत असू बरं? ओजसने मोठ्याने वाचलं की, त्याचं अभिवाचन सुधारेल म्हणून का?

ह्या वरच्या प्रश्नाचं उत्तर 'होय' असलं तरी हे मूळ कारण हे निश्चितच नाही.

मी, त्याची आई अनुजा आणि ओजसचा बाबा भरत, आम्ही दोघंही पूर्णतः दृष्टिबाधित आहोत. वाचनाची आवड आम्हा दोघांनाही. आम्ही दोघं विशेष शाळांमध्ये शिकलोय. आमच्या वाचनालयात ब्रेल लिपीतली काही पुस्तकं होती. वाचनालयाच्या तासाला आम्ही ब्रेलमधून गोष्टी वाचायचो. हळूहळू मोठे होत गेलो, तशी वाचनाची भूक वाढली. ती भूक भागवायला मदत झाली ती 'नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)' या संस्थेच्या 'टॉकिंग बुक लायब्ररी'ची. मराठी, हिंदी, इंग्रजी यांच्यासह इतर सर्वच भारतीय भाषांमधली जवळपास लाखो पुस्तकं इथे ध्वनिमुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. आपण वर्गणी भरायची आणि हवं ते पुस्तक मिळतं. पूर्वी सिडीमध्ये घालून मिळे, तर हल्ली ड्राइव्हवर लिंक मिळते. आमच्याकडेही अशी चार-पाचशे बोलकी पुस्तकं आहेत.

ओजस जेव्हा लहान होता, तेव्हा त्याला



आवडतील अशी अनेक बोलकी पुस्तकं आम्ही लॅपटॉपवर लावून तिघं मिळून ऐकायचो. हॅरी पॉटरची संपूर्ण मालिका आम्ही तशीच ऐकलीये.

परंतु, या ध्वनिमुद्रणाला अनेक मर्यादा येतात. कधी वाचून रेकोर्डिंग करणारे कमी असतात, कधी नवनवी पुस्तकं ध्वनिमुद्रित करण्यासाठी लेखक, प्रकाशकांच्या परवानगीचा अडसर येतो. आणि वाचणारी मंडळी त्यांच्या आवडीची पुस्तकं वाचून 'नॅब'कडे देतात. त्यांच्या व आमच्या आवडीनिवडीमध्ये फरक असल्यामुळेही आम्हांला आमच्या पसंतीने वाचता येत नाही.

लहानपणी आम्ही याच अडचणीत असायचो. छापील पुस्तकांपासून आम्ही दूर होतो. त्यामुळे आमच्या दोघांचंही बाल-कुमार साहित्याचं वाचन हवं तसं झालंच नाही. त्या वयातल्या वाचनात आम्ही मागे पडलो. लहान मुलांच्या पुस्तकांतली अद्‌भुत, जादुई दुनिया आमच्यापासून जरा दूर राहिली होती.

आमचा ओजस वाचायला लागला आणि आम्ही लहानपणी अत्यंत मर्यादेत अनुभवलेलं बाल-गोष्टींचं जादूमय जग आम्ही नव्याने अनुभवू लागलो. तो आमच्यासाठी वाचू लागला आणि आम्ही त्या बाल-साहित्याच्या जगात रममाण व्हायला लागलो. आठ वर्षांच्या ओजसला पडणारे प्रश्न तो सतत आम्हांला विचारत असतो. त्या प्रश्नांची उत्तरं त्याला

समजतील अशा भाषेत देण्यासाठीही आम्हांला या बालसाहित्याचा उपयोग होत आहे. हा आणखी एक फायदा! आणि आम्ही तर जणू आमचं बालपण पुन्हा नव्याने जगतोय, या गोष्टी ऐकता ऐकता. आम्ही कित्ती गमतीच्या अनुभवाला तेव्हा मुकलो होतो, हे आता जाणवतंय.

शिवाय आमच्या धाकट्या असीमला वाचनाशी मैत्री करवून देण्यासाठी पालक म्हणून आम्हांला विशेष प्रयत्न करावे लागत नाहीयेत. हा तिसरीतला ओजस दादा धाकट्या भावालाही वाचून दाखवतो. चित्रांवरून गोष्ट सांगतो. एकाच वेळी आम्हा तिघांना वाचनाच्या अद्‌भुतरम्य जगात घेऊन जाणारा, वाचणारा ओजस हा आमचा वाचन-दूत झालाय!

ओजसच्या निमित्ताने 'कुटुंब रमलंय वाचनात' हा अनुभव आम्ही सगळेजण घेऊ शकतोय!

**–अनुजा संखे**
*anujasankhe@gmail.com*
*(बँक अधिकारी आणि लेखिका)*

# कल्पककला

## मक्याच्या सालींचे फूल



**साहित्य–** मक्याची सालं, दोरा, कार्डबोर्ड, गोंद, लहान गोल आरसा.

**कृती**– मक्याच्या सालींचे लहान-मोठे आयताकृती तुकडे कापून घे. आता त्या तुकड्यांना मधोमध दुमडून त्यांची दोन्ही टोकं दोऱ्याने बांधून घे. आता ह्या फुलाच्या पाकळ्या तयार होतील. नंतर कार्डबोर्डचा एक गोलाकार कापून घे. त्यावर फोटोत दाखविल्याप्रमाणे, तयार केलेल्या पाकळ्या एकावर एक चिकटवून त्याच्या मध्यभागी एक छोटासा गोल आरसा चिकटवून घे. असे हे गुबगुबीत फूल तयार होईल. गिफ्ट पॅक करताना, ही फुलं सजावट करायला उपयोगी होतील.

**–स्वरूपा वक्नाली**
*swarupamv@gmail.com*


मिनू
अदिती पाध्ये-देसाई
aditeepd@gmail.com
वाह मिनू.. मज्जा आहे तुझी! वाढदिवसासाठी गिफ्टवर गिफ्ट मिळतायत. आता हे कोणाकडून आलंय?
इथे- सीमा पाटील- असं लिहिलंय?..
हं..? सीमा? अगं ती तर माझी शाळेतली मैत्रीण.
वॉव!
शाळेतली सगळ्यात जवळची मैत्रीण. कित्ती मज्जा करायचो आम्ही. खरंतर आमचं फार बोलणं होत नाही. मागे एकदा तिने मला ऑनलाइन एक पुस्तक पाठवलं, तितकंच. तिला कसं कळलं आज तुझा वाढदिवस आहे ते. थांब मी तिला फोन लावते.. तू तिला 'थँक यू' म्हण हं.
हाय सीमा.. अगं तुझ्या नावाने पार्सल आलंय. उघडून बघितलं तर फ्रॉक. मी अगदी...
ओह! ते पार्सल तुझ्या पत्त्यावर पोहोचलं का? अगं मी माझ्या सियासाठी फ्रॉक ऑर्डर केला होता. आज मला मेसेज आला की, तुमचं पार्सल डिलिव्हर झालंय. मी गोंधळले. त्यांना फोन लावणार इतक्यात तुझा फोन आला. मागे तुला पुस्तक पाठवलेलं ना.. ऑर्डर देताना बहुतेक तुझा पत्ता सिलेक्ट केला मी. बाकी कशी आहेस तू?
ही ही ही

खाद्यसफर

# उन्हाळ्यातला गारवा



**उन्हाळा** आला की कुंभार गल्लीत जाऊन आमची माठाची खरेदी व्हायची. आमची आई त्या माठात कधी वाळा, तर कधी मोगऱ्याची फुले घालायची. ते सुगंधी गार पाणी पिताना फार भारी वाटायचे.

आम्ही उन्हाळ्यात आजोळी जात असू. तिथे आइस्क्रीम मिळायचं नाही. ‘आइस्फ्रूट गारेगार’च्या गाड्या फिरायच्या. बर्फ किसून त्यावर कालाखट्टा, लेमन, ऑरेंजचा इसेन्स घालून काडी खुपसली की ते रंगीबेरंगी आइस्फ्रूट चोखून खाताना जीभ आणि कपडे, दोन्हीही रंगायचे. पण तो बर्फ चांगल्या पाण्याचा नसणारच, म्हणून आई तो खायला

उन्हाळ्याचा त्रास होऊ नये, म्हणून आपल्याकडे अनेक नैसर्गिक पदार्थांचा वापर केला जातो. उन्हाळ्यातली खाद्यसंस्कृती खूप मोठी आहे... शरीराला गारवा देणारी आहे.

मज्जाव करायची.

उन्हाळ्यातल्या एखाद्या दिवशी आमच्या आजोळी 'पॉट आइसक्रीम' बनवले जायचे. त्यासाठी अगोदर 'आइस्क्रीम पॉट' भाड्याने आणावे लागे. लाकडी मोठा पॉट आणि त्याच्या आत एक डबा असायचा. आतल्या डब्यात  एक रवी असायची. त्या डब्याच्या झाकणाला एक हॅन्डल असायचे. त्या डब्यात आटवलेले दूध, साखर आणि आंब्याचा रस असे साहित्य भरायचे. बाहेरच्या लाकडी भांड्यात बर्फ आणि खडे मीठ भरायचे. बर्फात खडे मीठ टाकले की बर्फ लवकर वितळत नाही. मग आतल्या डब्याचे हॅन्डल फिरवत बसायचे. हॅन्डल फिरले की दूध आणि रस घुसळले जायचे आणि त्याचबरोबर बाहेरच्या बर्फामुळे ते हळूहळू गोठायला लागायचे. सुरुवातीला आतल्या डब्यातले दूध आणि रस पातळ असल्याने हॅन्डल फिरवणे सोपे जायचे. जसजसे आइसक्रीम तयार व्हायला सुरुवात व्हायची, तसतसे हॅन्डल जड व्हायचे. मग घरातली तरुण हट्टीकट्टी मंडळी हॅन्डल फिरवायला सुरुवात करत. तो टप्पा आला की, आमच्या उत्साहाला उधाण येई. आम्ही आपापले बाऊल, चमचे घेऊन आइसक्रीम खायला सज्ज व्हायचो.



'पॉट आइसक्रीम'

माझे आजोळ विदर्भातल्या हिंगणघाटचे. तिथे एखाद्याच घरी पंखा असायचा. उन्हाळ्यात दारे, खिडक्यांच्या बाहेर वाळ्याचे पडदे लावत. त्यावर पाणी शिंपडले की घरात छान गार वाटायचे. स्थानिक लोकांना विपरित हवामानाशी जुळवून घ्यायच्या युक्त्या माहिती असतात. ते तीव्र उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात त्यांच्या खाण्याच्या पदार्थात आणि राहणीमानात बदल करून त्यांचे आरोग्य चांगले ठेवतात.

उन्हाळ्यात आमचे आंबे खाण्याचे प्रमाण पाहून आमची आजी आम्हांला रोज एक चमचा कडूलिंबाचा रस द्यायची. त्यामुळे शरीर आतून थंड राहायचे. दुपारच्या जेवणात दही व कांदा खायला द्यायची. सकाळचा नाश्ता म्हणजे शिळ्या पोळ्या आणि गूळ-कैरीचे गोड लोणचे आणि कांदा. कच्चा कांदा शरीरात साठलेली उष्णता कमी करतो. त्यावेळी दुपारच्या जेवणातल्या भाज्या म्हणजे कांदा, दुधी भोपळा किंवा ढेमसे. कारण त्या भाज्या थंड प्रकृतीच्या असतात. दुपारच्या चहाच्या वेळी 'काकडी पीठ' खायला द्यायची. 'काकडी पीठ' म्हणजे सातूच्या पीठात किसलेली काकडी, लोणचे, कच्चा कांदा, गूळ घालून कालवलेले पीठ. ते पीठ खूप छान लागते. (सातूचे पीठ म्हणजे हरभरे आणि गहू खरपूस भाजून जात्यावर दळलेले पीठ). बिहार, झारखंडमध्ये उन्हाळ्यात या सत्तूच्या पीठाची लस्सी पितात. त्यात बारीक कांदा, किंचित साखर, मिरीची पूड, लिंबाचा रस, चाट मसाला आणि चांगले ग्लासभर पाणी घालून मोठ्या ग्लासमधून सत्तू की लस्सी प्यायली की उन्हाळ्याची चिंताच नको!

तेव्हा विदर्भात ताक सर्रास मिळायचे नाही, पण पन्हे आणि लिंबाचे सरबत मोठ्या प्रमाणात करून ठेवले जायचे. लिंबाच्या सरबतात मद्रासचा बिट्ट्या



गूळ घालायचे. तो गूळ किंचित खारट असतो. गूळ घातलेले लिंबाचे सरबत उन्हाळ्यात पित्तामुळे होणारी मळमळ आणि चक्कर कमी करते.

जिथे दूधदुभते भरपूर असते, उदाहरणार्थ गुजराथमध्ये, तिथे उन्हाळ्याच्या दिवसात दुपारच्या वेळी घरी आलेल्या पाहुण्यांना चहा, कॉफीऐवजी जिऱ्याची पूड घातलेले ताक द्यायची पद्धत आहे.

उन्हाळ्यात दिल्लीला 'शिकंजी' म्हणजे मसाला घातलेले लिंबाचे सरबत आणि थंडाई मिळते. काकडीच्या बिया, खरबूजाच्या बिया, सबजा बी, खसखस, वेलदोड्याची पूड, बदाम आणि गुलाबाच्या पाकळ्या घोटून घोटून थंडाई बनवतात.

एक गोष्ट आहे- पूर्वी म्हणे छत्तीसगडमधल्या आदिवासी राजाची राजकन्या अगदी नाजूक आणि सुकुमार होती. एकदा एवढा उन्हाळा आला की तिथल्या जंगलातल्या नद्या, ओढे, तळी, सगळे आटून गेले. नाजूक चणीची राजकन्या सतत घामाघूम झालेली असायची. उन्हाने तिच्या हातापायांची आग आग व्हायची. ती कळवळून रडायची. राजा, राणीला काही सुचत नव्हते. एके दिवशी राजा आणि त्याचे सरदार जंगलात जरा लांबवर फिरायला गेले. फिरता फिरता अगदी घनदाट जंगलात शिरले. तिथे एक झोपडी होती. झोपडीत एक आजी आणि तिची चार नातवंडे राहात होती. त्या झोपडीत गेल्याबरोबर राजा आणि सरदारांना तिने अंबाडीचे लाल सरबत प्यायला दिले. ते सरबत पिऊन ऐन दुपारच्या वेळी सुद्धा पोटात छान थंड वाटले. सर्वजण ताजेतवाने झाले. राजा आणि सरदार राजकन्येच्या त्रासाबद्दल बोलत असताना, आजीबाईंनी ते बोलणे ऐकले. तिने त्यांना तीन छोट्या बरण्या दिल्या. एका बरणीत होता गुलकंद म्हणजे गुलाबाच्या पाकळ्या आणि खडीसाखर घातलेला गोड खाऊ. दुसऱ्या बाटलीत होता मोगराकंद आणि तिसऱ्या बाटलीत होता कमळकंद. राजकन्येला ती तिन्ही औषधे फारच उपयोगी पडली आणि ती पूर्वीसारखी हसायला, खेळायलाही लागली.

आजही उन्हाळ्याच्या दिवसांत मुलांना उन्हाळ्याचा फार त्रास व्हायला लागला की गार दुधात गुलकंद घालून देतात. हल्ली अनेकजण एका पाण्याच्या बाटलीत थोडी फुले असलेली कोथिंबीरीची पाने, काकडीच्या एक दोन फोडी, दोन तीन थेंब लिंबाचा रस आणि चिमूटभर खनिज मीठ घालून तेच पाणी दिवसभर पीत राहातात. या पाण्यामुळे शरीरातला ओलावाही टिकतो आणि घामावाटे गेलेली पोषक तत्त्वेही लगेच परत मिळतात.

उन्हाळ्यातली उष्णता कमी करण्यासाठी कोकणातला निसर्गच सज्ज असतो. तिथे मिळणारी कोकमे, काजूफळे (बोंड), करवंदे, जांभळे, तोरणे, नेर्ली, डोंबले आणि आळू अशी सगळी रानफळे उन्हाळ्यातली लाही लाही कमी करतात.

उन्हाळ्यातला कोकणातला सकाळचा नाश्ता म्हणजे भाताची पातळ पेज, लोणचे आणि पोह्याचा पापड एवढेच असते. त्याचबरोबर कैरीचे पन्हे, सोलकढी, कोकम सरबत, बेलाचे सरबत, आवळ्याचे सरबत असे पदार्थही शरीरातला ओलावा टिकवून ठेवायला मदत करतात.



समुद्रकिनारी उन्हाळ्याचा जास्त त्रास होतो. खूप घाम आला की अशक्त, गळून गेल्यासारखे वाटते. कोकणातल्या छोट्या छोट्या गावात धणे घातलेला 'कोथमिरी चहा' पितात.

कर्नाटकातली किनारपट्टी म्हणजे गोकर्ण, महाबळेश्वरसारख्या ठिकाणी तीळ भिजवून वाटून त्याचे दूध काढतात. त्यात पांढऱ्या जास्वंदीचा अर्क घालतात. रोज सकाळी अर्धा कप तिळाचे दूध पिऊन बाहेर पडले की उन्हाचा त्रास कमी होतो.

आमच्या कोल्हापुरात सुद्धा अनेक घरी सकाळी नाचणीची आंबील करून ठेवतात. जिरे आणि मीठ घातलेली नाचणीची आंबील मडक्यात ठेवतात आणि येता-जाता गार आंबील पितात. उन्हाळ्यात सोलापूरसारख्या भागात ताक घालून ज्वारीच्या भाकऱ्या करतात.

कर्नाटकात घरोघरी उन्हाळ्यातल्या नाश्त्याला 'मसरा अवलक्की' किंवा दुपारच्या जेवणासाठी 'मसरान्ना' म्हणजे दही पोहे आणि दही भात करतात. कर्नाटक आणि तेलंगणातला 'कैरी घातलेला भात म्हणजे चित्रान्न' हा सुद्धा थंडावा देणाराच पदार्थ आहे.

एकदा माझ्या एका क्लासमध्ये युगांडाचे विद्यार्थी होते. आमचे क्लासेस उन्हाळ्यात चालायचे. कधीकधी लाईट गेले की वर्गातली बाकीची मुले लगेच वह्यांनी वारा घ्यायला सुरुवात करत, पण त्या युगांडाच्या मुलांना अजिबात घामसुद्धा यायचा नाही. मी एकदा त्यांना तसे विचारले. त्यांच्यापैकी एका मुलीने मला कसावासारख्या कसल्यातरी मुळांचे 'निळसर जांभळे' सरबत आणून दिले. 'कसावा' हे एक कॅक्टससारखेच दिसणारे झाड असते. त्याच्या मुळांचे सरबत शरीराचे तापमान एवढे थंड ठेवते की, बाहेरचे तापमान कितीही वाढले तरी काहीच त्रास होत नाही.

शहरातले लोक उन्हाळ्यात पंखे आणि एसी लावतात. पण अजूनही खेडोपाड्यात तेवढी वीज नसते. त्याचबरोबर शेतकऱ्यांना उन्हात, शेतात काम करावे लागते. गावात, आवारात पावसाळ्यापूर्वीची कष्टाची कामे असतात. अशा वेळी उन्हाळ्यात थंडावा देणारे पदार्थ त्यांची ताकद टिकवून ठेवतात, त्यांना आजारी पडू देत नाहीत.

भारतात जिथे जिथे कडक उन्हाळा असतो, अशा ठिकाणच्या उन्हाळी पदार्थांची यादी केली तर कितीतरी नवीन वेगळे पदार्थ माहीत होतील. कराल तुम्ही? तुमच्याही आजी-आजोबांनाही उन्हाळ्यात थंडावा देणारे आगळे पदार्थ माहिती असणारच. त्यांना विचारून तुम्ही यादी करा. करायला सोपे असतील तर करूनही पाहा.

एक अगदी सोपा पदार्थ सांगते- कलिंगड आणि काकडीचे सॅलड. घरातल्या मोठ्या व्यक्तीकडून कलिंगड आणि काकडीच्या छोट्या फोडी करून घ्या. त्यावर खनिज मीठ घाला. मग त्यावर पिठीसाखर घालून त्यावर लिंबाचा रस शिंपा. त्यावर पुदिन्याची पाने कात्रीने चिरून घातली तर एकदमच बेस्ट लागतं.

**-डॉ. मंजूषा देशपांडे**
*dmanjusha65@gmail.com*
*(संचालक, लोकविकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)*


दंगल
चित्र- गिरीश सहस्रबुद्धे

‘गोष्टी विचारवंतांच्या’ आणि ‘गप्पा आजोबांशी’ या प्रसिद्ध पुस्तकांचे लेखक कै. बाळकृष्ण लक्ष्मण शुक्ल यांच्या स्मरणार्थ किशोर मुलांच्या वयोगटासाठी ‘वयम्’ मासिक, शुक्ल परिवार व ‘अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशन’, नासिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मराठी कथालेखन स्पर्धेतील ही निवडक कथा-

**बंटीचे** चौथीचे वर्ष सुरू झाल्यापासून आईने त्याला, रोज वीस मिनिटे पेपर वाचायचाच, असा नियम घालून दिला होता. बंटीलाही पेपर वाचन फार आवडे. आपण कुणीतरी मोऽऽठ्ठं झाल्यासारखं वाटे.

आज तर तो पेपरची जास्तच आतुरतेने वाट बघत होता. त्याच्या शहरात मोठी दंगल झाल्याची बातमी काल त्याने टीव्हीवर ऐकली होती. गोळीबारही झाला होता. म्हणजे एकदम पिक्चर स्टाईल फायटिंग झाली असणार. त्याला सगळं नीट वाचायचं होतं.

बंटीने पेपर घेऊन अख्खी बातमी वाचली, पण प्रत्यक्ष दंगल कशी झाली याबद्दल काहीच नव्हतं त्यात. बऱ्याच जणांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले होते. तेच सगळं छापून आलं होतं. बातमीमध्ये “विशिष्ट जमातीचा जमाव शस्त्रांसह चालून गेला आणि दंगल उसळली,” हे वाक्य होतं.

“बाबा, आपल्या कॉलनीत विशिष्ट जमातीचे लोक किती?”

“काय? विशिष्ट जमातीचे? अरे बंटी, विशिष्ट नावाचा कुठलाही धर्म नसतो. पण जाती आणि धर्मवाचक उल्लेख टाळायचे म्हणून पेपरात तसं लिहितात. आणि कुठल्या जातीची किंवा धर्माची आहेत म्हणून लोक दंगल करत नाहीत; तर जी माणसं अविचारी असतात, ज्यांना आपल्या समाजाबद्दल प्रेम नसतं ते लोक दंगल करतात. आपल्या एरियात असं काही होणार नाही. तू काळजी करू नकोस.”

आपल्याकडे असं काही होणार नाही, हीच तर बंटीची काळजी होती. त्याला दंगल प्रत्यक्ष बघायची होती.

“पण बाबा, बाहेरून अविचारी लोकांनी येऊन दंगल केली तर...?”

बंटीचं वाक्य अर्धवटच राहिलं. खालून खूप कोलाहल ऐकू येऊ लागला. इतक्यात फोन वाजला- “अहो, ट्रकातून माणसं दगड, काठ्या, बाटल्या घेऊन येतायेत... सावध राहा...”

आई-बाबा पटकन उठले. दोन क्षण त्यांना काही सुचेना.

“बंटी.. सोफ्यावर एका जागी बस, देवासारखा.”

बाबांनी पोलीस स्टेशनचा फोन फिरवला. आई पटापट सगळ्या रूमची दारं, खिडक्या बंद करू लागली.

ती दोघं कामात गुंतलेली पाहून बंटी हळूच बाहेर सटकला. उड्या मारतच जिना उतरून खाली आला. कंपाऊंडच्या बाहेर बरेच आवाज येत होते. बाहेर पाय टाकायचा बंटीला धीर होईना. मग दंगल कशी दिसणार. मनाचा हिय्या करून बंटी बाहेर आला.

भाजीवाल्या रामूभैय्याची गाडी उलटी झाली होती. भाजी इकडे तिकडे पसरली होती. रामूभैय्या तर कुठे दिसतही नव्हता. बंटी गाडीच्या आडोशाला उभा राहिला.

लोक सैरावैरा पळत होते. मारणारे कोण आणि पळणारे कोण हे समजतच नव्हतं. प्रत्यक्ष दगडफेक मात्र थोडी पुढे सुरू होती. तिथपर्यंत पोहोचायचं

कसं हाच बंटीपुढे मोठा प्रश्न होता.

एवढ्यात पोलिसांच्या गाडीचा सायरन वाजू लागला. आता पोलीस आले की, दंगल थांबणार. तेव्हा ती थांबायच्या आत आपण तिथे पोहोचूया, म्हणून बंटी तडक निघाला. झर्रकन रस्ता क्रॉस केला. आता तो फूटपाथवर चढून धावत पुढे जाणार एवढ्यात पोलिसांची जीप अगदी जवळ क्षणभर थांबल्यासारखी झाली.

"पोरं कुठे कडमडतायत देव जाणे..." या वाक्याबरोबर एक मजबूत हात बाहेर आला आणि त्याने बंटी जीपमध्ये ओढला गेला.

पोलीसकाकांनी त्याला मागे बसवलं आणि तंबी दिली, "गप्प सीटखाली बसून राहा. डोकं वर काढू नकोस..." एवढ्यात एक दगड सणसणत जीपच्या दिशेने आला. बंटीने डोळे गच्च मिटले. जीपवर जाळी असल्याने फक्त मोठा आवाज झाला. आता मात्र बंटी जाम घाबरला. त्याला रडू येऊ लागलं. आपण घरापासून किती लांब आलो हे बघायला त्याने मान वर केली. "अरे, तुला सांगितलं ना, सीटखाली जा म्हणून? जीपमध्ये एखादा दगड येऊन पडला म्हणजे?"

बंटी पटकन सीटखाली बसला. त्याला दगडापेक्षा पोलीसकाकांच्या आवाजाचीच जास्त भीती वाटली. पण पोलीसकाकांचं काय? ते तर सीटखाली बसून जीप चालवू शकत नाहीत. बंटीला त्या परिस्थितीतही एक आयडिया सुचली. पोलिसांच्या जीपमध्ये ड्रायव्हरची सीट टपावर करायची आणि जाळ्या बसवायच्या म्हणजे त्यांना लागणार नाही. आई-बाबांना ही आयडिया सांगितली पाहिजे.

अरे बापरे... आई-बाबांची नजर चुकवून आपण बाहेर पडलोय. आणि आता जवळ जवळ तास झाला. आई-बाबा किती काळजीत असतील. बंटीला मोठ्याने रडू आलं. एवढ्यात जीप थांबली.

"ये रे बाहेर"

मुसमुसणाऱ्या बंटीला पाहून पोलीसकाकाही जरा विरघळले. "रडू नको बेटा. जरा वेळ बस. मग तुला घरी सोडतो. तुला पत्ता माहीत आहे ना?" बंटीने डोळे पुसत "होय" म्हणून मान हलवली. पोलीसकाकांना काय समजलं देव जाणे.

"मोरे, याला केबीनमध्ये बसव. पंखा लाव. चहा दे जरा. चुकलंय पोर. दंगलीत भेदरलाय. पत्ताही येत नाहीय. वातावरण जरा निवळलंय. मी साहेबांना रिपोर्ट करतो. मग पाहू याचं घर कसं शोधायचं, कुठल्या चौकीला मिसींग कम्प्लेंट आलीय का, जरा चौकशी करा."

बंटीला एका खोलीत नेऊन बसवलं, त्याला जरा रागच आला होता. शाळेत जायच्या आधीपासून बंटीला नाव, पत्ता, फोन नंबर सारं सांगता येत होतं आणि पोलीसकाका त्याला अगदीच बावळट ठरवून गेले होते. शिवाय भेदरटही म्हणाले.

एवढ्यात बंटीच्या पुढ्यात चहा आला. बंटीला जाणवलं, आपल्याला खूप भूक लागलीय. तोंड भाजत असतानाही त्याने चहा पिऊन टाकला.

इतक्यात त्याला टेबलावर फोन दिसला. आयडिया! आपण घरी फोन लावू या म्हणजे आई-बाबा काळजी करणार नाहीत.

बंटीने रिसिव्हर उचलून डायल करायला सुरुवात केली...

"मोरे, बाहेरचा फोन कोणी उचलला?" मघासच्या पोलीसकाकांचा खणखणीत आवाज आला. घाबरून बंटीने पटकन फोन ठेवून दिला. चुळबुळत तो तसाच बसून राहिला. आपल्याला फारच उशीर होतोय, आई-बाबा खूपच काळजी करत असणार हे त्याला मिनिटा-मिनिटाला जाणवू लागलं.

दहा मिनिटांनी पोलीसकाका बाहेर आले. ते काही बोलायच्या आतच बंटीने, "काका, मी बंटी म्हणजे योगेश सुधाकर कारखानीस" ...

पत्ता... फोन नंबर सगळं एका दमात सांगितलं. पोलीसकाका त्यांच्या मिशांना न शोभेसं मृदू हसले. 'सांग परत एकदा नंबर.' बंटीने सांगितलेला नंबर त्यांनी डायल केला.

'हॅलो, कारखानीसांचं घर? मी फणसवाडी पोलीस स्टेशनमधून बोलतोय. तुमचा मुलगा बंटी... हो... हो... ऐका.. अगदी सुखरूप आहे. इथे माझ्यासमोर बसलाय. मी स्वतः त्याला घरी आणून पोहोचवतो. तुम्ही निघू नका. कर्फ्यू लागलाय तुमच्या एरियात.'

बंटी टुणकन उडी मारून निघाला.

"पोलीसकाका, आता मी तुमच्या बाजूला पुढे बसू?"

"हं चल लवकर. पण काय रे तू कुठे निघाला होतास?"

"दंगल बघायला..."

"काय?..." काका ओरडलेच.

"हो... मला दंगल कशी होते ते पाहायचं होतं."

"मग चांगली समजली का दंगल?"

"छे... काहीच कळत नव्हतं. नुसती पळापळ. आणि दोन मिनिटांत तुम्ही मला गाडीत ठेवलंत."

"हो बुवा. चुकलंच माझं." पोलीसकाका गमतीशीर चेहरा करून म्हणाले, "तुला तसंच पुढे जाऊ द्यायला हवं होतं. पाहणी करायला."

"पोलीसकाका, तुम्ही किती दंगली पाहिल्यात?"

"खूप..."

"दंगल कशामुळे होते?"

"तशी ठरावीकच कारणं असतात. म्हणण्यापेक्षा दंगल करणारे ते कारणं मुद्दामहून करतात."

"म्हणजे?..."

"म्हणजे प्रार्थनास्थळांजवळ वाईट गोष्टी टाकणे..."

"प्रार्थनास्थळ म्हणजे?"

"म्हणजे आपलं देऊळ, चर्च, मशिद, गुरुद्वारा..."

"हं. देवबाप्पाची घरं..."

"अगदी बरोबर... तिथे गोंधळ घालणे. नेत्यांच्या पुतळ्यांना काळं फासणे... वाट्टेल ते करतात... समजेल तुला हळूहळू. चल उतर. घर आलं तुझं," बंटी धावत घरात शिरला.

आईचे डोळे लालभडक होऊन सुजले होते. बहुधा आपल्या काळजीने खूप रडली असणार. बाबांचा चेहराही ओढलेला दिसत होता. बंटी थेट आईच्या कुशीत शिरला.

"बंटी, राजा किती घाबरवलंस रे."

"बंटी, पोटभर दंगल पाहिलीस ना? आता नाव नाही ना काढणार दंगलीचं?"

"हो बाबा... पण मला एक शंका आहे..."

"बंटी तुझ्या शंकाबिंका बंद एकदम.." छोटासा धपाटा मारत आई म्हणाली. "हे पोलीसकाका वेळेवर भेटले नसते तर... तुमचे खूप उपकार आहेत." आईचे डोळे पुन्हा डबडबले. बाबांनीही हात जोडले होते.

पोलीसकाका गडबडून म्हणाले, "अहो.. आमचं कामच आहे ते. बराय मी निघतो. दाराला चार दिवस आतून कुलूपच घाला, नाहीतर पुन्हा निघायचे साहेब पाहणी करायला." सगळेजण मोठ्याने हसले.

"जरा सरबत तरी घ्या..."

"नको वहिनी, तणाव बराच आहे. निघतो मी. सतत पेट्रोलिंग करायला हवं आठवडाभर, नाहीतर दुसरीकडे दंगल व्हायची."

"या दंगली होऊच नयेत म्हणून माझ्याकडे भन्नाट आयडिया आहे."

आई-बाबा दटावत असताना पोलीसकाकाच म्हणाले, "सांग बरं बंटी तुझी आयडिया."

"काका, या वर्षी गणपती विसर्जनाला आपल्या शहरातले सगळे पुतळेसुद्धा मिरवणुकीत घ्यायचे. आणि वाजतगाजत, मानाने त्यांचं विसर्जन करायचं.

पुतळेच राहिले नाहीत तर दंगली होणारच नाहीत.”

“अरे पण, हे पुतळे त्या थोर पुरुषांची स्मारकं... आठवण म्हणून असतात. त्यातून आपल्याला स्फूर्ती मिळते.”

“बाबा... तुम्हीच म्हणता ना, खरी ऊर्जा वाचनातून मिळते. मग त्या रिकाम्या जागी त्या थोर पुरुषांनी लिहिलेली किंवा त्यांच्या आयुष्यावर लिहिलेली पुस्तकं ठेवायची. म्हणजे त्यांचं स्मारकही झालं आणि विचारांची स्फूर्तीही मिळाली.”

“बंटी, तुझी आयडिया ग्रेटच आहे बाबा. तुला ‘आयडिया कारखानीसच’ म्हणूया...”

सगळे हसले.

“मस्करी राहू दे... पण खरंच तुझ्या एवढी मुलं वाचनातून घडायला लागली; पुतळे, मिरवणुका यांत अडकून न पडता विचार पुढे न्यायला लागली, तर आमचं काम खूपच कमी होईल. येतो मी...”

**-डॉ. हर्षदा प्रसाद देवधर**

*drharshadadeodhar@gmail.com*

## GOOD FRIEND

**-Vaishanvi Mahimkar** | *mahimkarvaishnavi@gmail.com*

Can you find all the 15 good qualities of a good friend hidden across, down and diagonally in the word puzzlle below?

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Q | S | W | E | R | T | Y | U | I | O | P | I | P | O | I | U | Y | T | R | A |
| E | U | X | Z | C | O | O | P | E | R | A | T | I | V | E | Z | X | C | V | B |
| A | P | A | S | D | F | G | H | J | K | P | L | P | G | S | W | E | I | U | D |
| Z | P | C | V | B | N | M | L | P | K | J | H | R | E | L | I | A | B | L | E |
| H | O | N | E | S | T | H | G | F | L | D | K | I | N | D | D | S | A | Q | P |
| Z | R | W | L | S | A | Q | A | Z | W | A | S | X | E | C | D | C | A | Q | E |
| D | T | E | O | F | R | I | E | N | D | L | Y | E | R | R | F | O | F | V | N |
| T | I | T | V | L | G | G | B | N | H | Y | U | F | O | I | K | N | L | V | D |
| L | V | O | I | E | T | H | O | U | G | H | T | F | U | L | P | F | L | M | A |
| N | E | J | N | X | K | I | O | O | P | O | I | I | S | L | T | I | R | A | B |
| A | W | E | G | I | M | N | B | V | C | X | S | F | A | S | D | D | A | L | L |
| O | O | B | B | B | B | V | H | F | G | J | S | K | O | O | H | E | G | F | E |
| Q | L | I | S | L | O | Y | A | L | T | J | K | G | F | K | G | N | H | D | D |
| W | E | T | R | E | S | P | E | C | T | E | D | R | G | N | H | T | H | S | C |

*Answer-*

15 GOOD QUALITIES MY FRIEND HAS :

1. Loyal
2. Reliable
3. Kind
4. Honest
5. Cooperative
6. Respected
7. Thoughtful
8. Friendly
9. Supportive
10. Loving
11. Dependable
12. Confident
13. Generous
14. Playful
15. Flexible

# FIND MISTAKES IN THIS PICTURE

**-Aditi Padhye-Desai** | *aditeepd@gmail.com*





# Sky is the limit...

Illustrated by Juilee Mahimkar

**The** auto-rickshaw wheeled in and halted outside the gate. Akash Bhaiyya and Baba came out overjoyed. This wasn't the typical black and yellow auto-rickshaw for riding passengers; it was a private one.

"Registration done?" Dhara asked impatiently.

"Yes. Our participation in the 'Rickshaw Rally' is confirmed." Baba replied delightedly. Sagar punched his fist and tightly hugged Akash.

Akash studied in college while his younger twin siblings Sagar and Dhara were in eighth standard. They were close-knit siblings. Some of their neighbourhood friends teased the trio as SAD, an acronym of their names. But Akash simply altered it to 'Splendid-Amazing-Dynamic'. Akash was positive and full of life. He always believed 'If there is will, then 'Sky is the Limit'...'

Their Baba owned two auto-rickshaws especially for students' pick-up and drop services to nearby schools. At other times, he rode regular passengers. Coincidentally, Baba had recently purchased a second-hand private auto-rickshaw for their Maa's catering deliveries, when Akash read an advertisement about the 'Rickshaw Rally' in the newspaper.

Since Akash had a last few papers of exams left, he asked Sagar and Dhara to research more about the Rally. Summer vacations were on so they had ample free time on hand. The Rally was to happen next month. Both researched, noted pointers and gave Akash a comprehensive idea how the Rally was going to be.

Inspired by the famed 'Rickshaw Run', an event where auto-rickshaws drive along different routes across India to support a noble cause, a local NGO had conceptualized its miniature version, the 'Rickshaw Rally' with some tweaks from the original. They had organized the event last year with great success. Subsequently, many participants had enrolled even this year for the Rally. The team of riders could be maximum three in number who had to travel the route Mumbai-Goa and back in five days in an auto-rickshaw. They could choose any route to ride. The amount that a team collected through donations while meeting people along the way or through any other authentic channels, would go to a needy institution of their choice. The participants required a permit to ride an auto-rickshaw and they had to bring their own vehicle.

Akash was a safe driver. He would sometimes fill-in for Baba to ride the rickshaw though Baba never wanted him to ride one and only concentrate on his studies. Akash had participated in many trekking and mountaineering adventures before. When he read about the Rally, he wanted to try this new one. Once he was convinced, he mentioned about it to his parents.

"It appears risky. The route has Ghats with dangerous twists and sharp turns. What about breakdowns and toppling on roads? Auto-rickshaw isn't a car after all." Maa was worried.

"Bhaiyya's friend Rahul had participated last year. He said the Rally was worth experiencing once." Sagar emphasized.

"We don't fit the age criterion or else we would've accompanied Bhaiyya." Dhara pouted.

"But I will be going with him. Then what's the worry?" Baba immediately

supported Akash.

"And I am always there for whatever help." Omi Chacha, Baba's friend, who owned a garage and painting shop, joined the conversation while entering the house. He had just come to deliver one of Baba's rickshaws after servicing.

"In the 'Rickshaw Run', participants paint their rickshaws in very unique ways... their country's flags, tiger stripes, pictures of deities… just about anything. They suggest their theme well in advance and artists paint the rickshaws accordingly." Sagar had good knowledge.

"Those artists are called 'rickshaw pimpers'. I know many of them who do such jobs." Chacha specified.

"Pimpers?" Baba was unaware.

"Yes. It's a slang which means to beautify, to make stylish or even make something gaudy…" Sagar and Dhara had read about them.

"Our Akash, my right hand, is a master in painting different vehicles in my paint shop. Remember the 'Mickey Mouse' you had painted on a car? Why don't you paint your rickshaw likewise?" Chacha encouraged Akash.



"That's great. We already have ideas for that. The motive is it should look attractive to attract people." Dhara was excited.

"We can paint ocean with sea-life on rickshaw's front-side…" Sagar suggested.

"The lower rear portion can have trees, flowers, birds with a message 'Save our planet'." Dhara added.

"Then blue hood with white clouds all around… And 'Sky is the limit' message painted on top of the windshield." Sagar imagined.

"That's our Bhaiyya's funda anyway…" Dhara highlighted.

"We also need to keep space for the Rally's logo and our Registration number." Sagar observed.

"Bhaiyya, now it's up to you to paint all this. We have done the basic homework." Dhara teased to which Akash gave thumbs up. Since he was busy with his final exams he felt relieved that 'Splendid Sagar' and 'Dynamic Dhara' had helped him out.

"In my rickshaws I've put many beautification accessories, but I never knew painting rickshaw was an art." Baba admired.

In couple of days, after exams were over, Akash immediately got to his rickshaw 'pimping' job. His registration was also done now. He had just finished the first wash of light sea-green colour when Sagar and Dhara came there.

"Bhaiyya, in the Rally, we have to raise funds for a cause. Have you thought about anything?" Dhara asked curiously. Bhaiyya showed them a print-out of an eye hospital in Ratnagiri. This was on their Rally's route. Sagar and Dhara read the details together.

"Squint in children and babies? This says it is very common." Dhara pointed in the print-out.

"For deprived babies and children, the hospital gives free treatment. But they need funds. Bhaiyya, this is a fantastic thought…" Sagar noticed Akash's moistened eyes. He nudged Dhara. Both moved closer to Akash.

"I know how it is to live with a disability. At times, simple things become a challenge, even getting a driving license. With this Rally, if I can make a difference to someone, I'll feel blessed." Akash gestured in sign language.

Akash was born 'hearing impaired'. Maa and Baba did everything possible for his cure. But he never recovered. However, he overcame his disability graciously and could now communicate easily with sign language and lip reading.

"Don't forget to put the 'Hearing Impaired' logo on the hind glass." Akash reminded Sagar.

"But you don't need it now." Dhara protested.

"That's for others' safety." Akash gestured.

"Amazing Akash… " Sagar put his hand round Akash, "You are our hero. You inspire us to believe 'If there is will…'"

"Sky is the limit…" Dhara said and Akash smilingly gestured towards the sky…

**-Prachi Mokashi**

*mokashiprachi@gmail.com*

पकोडे

# विखडपाको

पकोडे, म्हणजे पक्षी कोडे! पक्ष्यांचे मनोगत मांडणारे नवीन धमाल सदर!

**गरुडासारखं** किंवा घारीसारखं आकाशात संथपणे घिरट्या घालत शांतपणे उडणं मला आवडत नाही आणि जमतदेखील नाही. घार किंवा गरुड आकाशात एकेकटेच भिरभिरत असतात. माझं तसं नाही. मला उडताना कंपनी लागते. घरपाकोळी, भांडिक, तारवाली आणि लालबुडी भिंगरी या माझ्या मैत्रीणी. मी नेहमी यांच्या सोबतीने उडताना तुम्हांला दिसेन. दुसरं म्हणजे मला आकाशात भिरभिरायला आवडतं. म्हणजे नेम घेतल्यासारखं मी काही सरळ रेषेत उडत नाही. तर खाली, वर, डावीकडे, उजवीकडे, सरळ-तिरकं असं कसंही उडते मी. ये अपना स्टाइल है!

माझं सध्याचं इंग्रजी नाव Dusky Crag Martin (डस्की क्रॅग मार्टिन). माझं शास्त्रीय नाव Hirundo concolor (हिरुंडो कॉंकलर). माझी लांबी जास्तीत जास्त १० सें.मी. असते म्हणजेच मी चिमणीपेक्षाही लहान. तुम्हांला माझी तीन मराठी नावं सांगते. मला पाकोळी, पंकोळी किंवा हुलुडे म्हणतात. आता माझं चौथं नाव ओळखा.

तुम्ही आम्हा पक्ष्यांचे पाय नीट पाहता का? झाडाच्या फांद्यांवर बसणारे जे पक्षी असतात, त्यांच्या पायाला मागच्या बाजूला एक बोट असतं. या मागच्या बोटामुळे त्यांना झाडाच्या फांद्यांवर चांगली पकड घेता येते. पण मला मात्र हे मागचं बोटच नाही. त्यामुळे मला झाडाच्या फांद्यांवर पकड घेता येत नाही आणि जमिनीवर टुणटुण उड्याही मारता येत नाहीत. मग आमच्यातले काहीजण एक आयडिया करतात. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या माझ्या काही मित्र-मैत्रिणी जोरदार वारा असेल तर मोठ्या दगडावर किंवा खडकावर बसतात. इथे बसताना पायाला असलेल्या तीन बोटांपैकी एक बोट मागे वळवून नखाने चांगली पकड घेतात. तुम्हांला कळलंच असेल की,



तुमच्यासारखेच हुशार आहोत आम्ही!

माणसं आमच्याकडून खूप गोष्टी शिकली. उदा. घर कसं बांधावं. म्हणजे तुम्ही काही नुसतं सिमेंटचं किंवा नुसत्या वाळूचं घर नाही बांधत. तर तुम्ही घर बांधताना सिमेंटमध्ये वाळू मिसळता, खडी मिसळता आणि पाणी घालता. आम्ही घरटं तयार करण्याच्या काळात आमच्या लाखग्रंथींच्या आकारात वाढ होते. मग घरटं बांधण्यासाठी चिखल गोळा करताना आम्ही त्यात आमची लाळ मिसळतो. घरट्याच्या मजबुतीसाठी वनस्पतींचे तंतू, तणाचे बुरकूल चिखलाच्या गोळ्यांमधे घोळवतो. मग आम्ही दोघं मिळून या चिखलाचे लहान लहान गोळे तयार करून विटेवर वीट ठेवावी त्याप्रमाणे गोळ्यावर गोळा रचून खोल बशीसारखं घरटं बनवतो. हे घरटं खडकाच्या पोटात तयार केलं असल्याने घरट्यावर आपोआपच खडकाचं छप्पर असतं. वेडावाकडा पाऊस पडला तरी घरटं भिजत नाही. कसंही ऊन पडलं तरी घरट्याला भेगा पडत नाहीत. आणि मुख्य म्हणजे हे घरटं चांगलंच टिकाऊ असल्याने ते आणखी दोन-तीन वर्षं सहज टिकतं. त्यामुळे ते पुन्हा पुन्हा वापरता येतं.

काही मुलं मला गमतीने 'एअर प्युरिफायर' म्हणतात. कारण मी मशकं, केंबरं, चिलटं असे हवेत उडणारे लहानसहान किडे टपाटप पकडून खाते आणि हवा स्वच्छ ठेवते.

तुम्हा मुलांप्रमाणे आमच्या लहान मुलांना पण लाडूच आवडतात. पण तुम्ही खाता ते रव्याचे, बेसनाचे, बुंदीचे, दाण्याचे, काजूचे लाडू आमच्या मुलांना आवडत नाहीत. आणि मला वाटतं, आमच्या मुलांना खूप खूप आवडणारे लुळमुळीत लाडू बहुधा तुम्हांला नाही आवडणार.

माणसांच्या मुलांप्रमाणे आम्ही पण पिल्लांना भरवतो. ती जरा मोठी झाली की घरट्याच्या बाहेर येऊन खडकावर बसतात. मग आम्ही माशांना, माशकांना, लहानसहान किड्यांना मारून, त्यांना चोचून चोचून आणि लाळेत मिसळून त्याचे मस्त मऊमऊ गिळगिळीत लाडू करून त्यांना भरवतो. आमची मुलं हे नॉनव्हेज लुळमुळीत लाडू मिटक्या मारत खातात. मुलांनो, आता तुम्ही कधी येणार आमच्याकडे 'लाडू पार्टी' करायला?

आता माझं नाव ओळखण्यासाठी मी तुम्हांला एक क्लू देते. 'ळीखडपाको' या शब्दातील पहिले अक्षर शेवटी ठेवलेत की तेच माझं नाव!

**-राजीव तांबे**
*rajcopper@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*

**शब्दाशब्दी**

**वर्गात तुझा खास मित्र/मैत्रीण असेलच. तुम्ही कसे सतत एकत्र फिरता? तसंच काही शब्दांचं आहे. ते कायम जोडूनच येतात. पण सध्या त्यातला एक मित्र हरवलाय! दे बरं शोधून... उदाहरणार्थ- चिट ----( पाखरू)**

**१ ) ----सोयरे २) अंगत ----- ३) कपडा ----**

**४) ----दागिना ५) -----पाणी ६) ---- अडका**

मनोविकास

क्रिकेटर फ्लिंटॉफ आणि युवराज सिंग यांच्यात बाचाबाची झाली. युवराजला आला राग. त्याने काय केलं त्यावर? इस्त्री किंवा गिझर खूप तापला की आपोआप थोडावेळ बंद होतात. का?

# तना-मनाचं नातं काय?

**"मायरा..."** आईने नुसती हाक मारली आणि मायरा फोन ठेवून पटकन अभ्यासाला लागली. का बरं? कारण आईच्या नुसत्या हाकेतून त्या मागची भावना, विचार मायराला कळला. अरे बापरे, आता वेळीच अभ्यासाला बसलं नाही तर आई रागावेल, हा विचार मनात आला आणि कदाचित भीती वाटली, म्हणून पटकन अभ्यासाला बसण्याची कृती झाली.

एखादी व्यक्ती काहीही बोलली नाही, तरी आपल्याला कळतं ना की ही रागावलीय, आनंदी आहे की दुःखी? हालचालीतून, चेहऱ्याच्या expressions वरून ते आपल्याला कळतं. अपेक्षेपेक्षा वेगळं काही छान घडलं की आधी डोळे चमकतात. काही मनाविरुद्ध किंवा चुकीचं घडलं की चेहरा पडतो, म्हणजे आपल्या भावभावनांचं दर्शनच असतं ना ते! यालाच आपण म्हणतो body language, देहबोली. संवादामध्ये जसे शब्द महत्त्वाचे, तसंच आवाज, त्याचा tone, expressions, हालचाली हे सगळं महत्त्वाचं. कारण त्यातून आपलं संपूर्ण मन प्रकट होत असतं. मित्राच्या फक्त एका हाकेतून ती हाक कशासाठी आहे आणि किती घाईने त्याच्यापर्यंत पोचायचंय, हे आपल्याला लगेच कळतं.

आईने काम सांगितलं की, किंवा अभ्यास, परीक्षा असली, आपला अभ्यास झाला नसला की, आपलं डोकं दुखायला लागतं, पाय दुखायला लागतात किंवा पोट दुखायला लागतं. पण पिकनिकला जायचं असेल तर? मग खरंच दुखणाऱ्या पायाचा विसरच पडतो किनई?

म्हणजेच काय तर शरीर आणि मन अगदी एकमेकांच्या साथीने चालत असतं. पण आपण खूप आधीपासून मन आणि शरीर यांना वेगळं ठेवत आलोय. टेन्शन आलं, भीती वाटली की, त्यात आपल्याला कमीपणा वाटायला लागतो. शरीराला काही झालं तर मात्र तसं आपल्याला वाटत नाही. आपण एका साध्या त्रिकोणाच्या माध्यमातून हे समजून घेऊ या?

हा त्रिकोण आपल्याला मन आणि शरीर यांची मैत्री सांगतोय. आपले विचार (Thoughts), भावना (Emotions) यांना अनुसरूनच आपलं वर्तन (Behaviour) होत असतं. आपण गाडीचं उदाहरण घेऊ. गाडी चालू होण्यासाठी काय काय लागतं? इंधन (Fuel), ठिणगी (Ignition) आणि चालक (Driver). म्हणजेच इंधन असताना, किल्ली फिरवल्यावर ठिणगी (spark) पडते आणि मग आपली गाडी योग्य दिशेने




जायला सुरुवात करते. असंच आपल्या विचारांच्या इंधनाला भावनांची ठिणगी मिळते, तेव्हा आपल्या शरीरामार्फत दिसतं ते आपलं वर्तन. युवराज सिंगने स्टुअर्ट ब्रॉडला सहा सिक्सर मारलेल्या आठवतात? कदाचित तुम्हांला नसेल आठवत, पण झालं काय, तर मॅच सुरू होती  इंग्लंड आणि भारत यांच्यात. फ्लिंटॉफ आणि युवराज यांच्यात झाली बाचाबाची. आता युवराजला आला राग (भावना-Emotion), कदाचित या रागाबद्दलचे वेगवेगळे विचार (Thoughts) आले असतील, जसे की, आता दाखवतोच तुला, किंवा भेट, मॅच झाल्यावर तुला बघून घेईन इत्यादी.

आता यावर काय काय वर्तन होऊ शकतं? युवराजने फ्लिंटॉफला रागाने बोलणं किंवा दोन ठोसे लगावणं किंवा दुर्लक्ष करणं. पण युवराजने काय केलं, तर आपल्या 'राग' या भावनेतून आलेल्या विचारांना, म्हणजेच spark आणि energy यांना एक चांगली दिशा दिली.  म्हणजे विचार आणि भावनांना निट चालना  (channelise) दिली, त्यामुळे वर्तन काय झालं? पुढच्या सहाही बॉल वर त्याने ६ सिक्सर मारल्या. याचा फायदा त्याला झालाच. त्याचा रेकॉर्ड उत्तम झाला. शिवाय आपल्या देशासाठीसुद्धा ती एक अभिमानास्पद गोष्ट झाली. आपले विचार, भावना आणि वर्तन जर योग्य दिशेने गेले तर त्याचा फायदा आपल्याला नक्की होतो आणि मग त्यातून एक समाधानही आपल्याला मिळतं.

"मला काही सुचतच नाहीये" हे वाक्य आपण कधी कधी म्हणतो? आठवून बघा.

"मला इतका राग आला की मला काही सुचतच नव्हतं."

"मला तर भीतीने काही सुचतच नव्हतं."

"मला इतका आनंद झाला ना की, मला काही सुचतच नव्हतं."

म्हणतो ना असं आपण? आपण असं का म्हणतो? कारण आपल्याला तेव्हा खरंच काही सुचत नसतं. कोणत्याही टोकाच्या भावनेमध्ये आपला मेंदू खरंच काम करत नाही. म्हणजे जशी इस्त्री किंवा गीझर खूप तापले की थोडावेळ बंद होतात ना, तसा आपला मेंदू पण आपली योग्य निर्णय घेण्याची क्षमता हरवू शकतो. आणि मग "माझ्या मनात असं नव्हतं" असं म्हणायची वेळ आपल्यावर येते.

काही वेळा मोठी माणसं आपल्याला सांगतात ना, की राग आला की १० आकडे मोज. या वेळात जर आपण शांत होऊन विचार केला तर आपण योग्य कृती करण्याची शक्यता वाढते.

थोडक्यात सांगायचं, तर आपलं मन आणि शरीर यांना वेगळं न काढता, आपल्या कोणत्याही कृतीमागे आपले विचार काय होते, आपल्या भावना काय होत्या- याचा विचार करण्याची सवय जर आपण आपल्याला लावली, तर आपली वर्तनाची म्हणजे कृतीची गाडी योग्य रस्त्यावरून, योग्य दिशेने चालेल.

**-वैदेही भिडे**
*vaidehi.bhide@gmail.com*
*(मानसिक आरोग्य कार्यकर्ता)*

# फुलांनी रंगवलं कोण?



**अवनीच्या** आईबाबांना शनिवार-रविवार जोडून सुट्टी आली होती. कुठेतरी निसर्गरम्य ठिकाणी मावशी, काकांबरोबर जाऊ या असं अवनीने सुचवलं. आई आणि मावशीचं बोलणं झालं आणि ठरलं की, एकत्र जायचं आणि मज्जा करायची. गाणी, गप्पा, खाण्यामध्ये प्रवास छान चालू होता. जसजसं पठार जवळ येत होतं, तसतशी हवा गार होत होती. खिडकीतून बघितलं तर काय, जसा घराच्या खोलीत गालिचा अंथरावा तसं अख्खं पठार रंगीबेरंगी, आकर्षक दिसत होतं.

ठिकाण येताच अवनी आणि मावशीचा गौरांग टुणकन् उडी मारून बाहेर आले. फुलं बघण्यात एकदम गुंगून गेले.

गौरांग एकदम म्हणाला, “ताई, हे बघ मिकी माऊस फूल. आकार तसाच आहे.” हे ऐकून सगळ्यांना हसू आलं.

“ए, हा बघ वेगळाच लव्हेंडर रंग. आणि लाल, पिवळया रंगांच्या किती छटा आहेत



**फुलांना इतके वेगवेगळे रंग का असतात? निसर्गाच्या रंगपेटीत आहेत तरी किती रंग? आणि ब्रश कोण फिरवतं त्या फुलांवर?**

या फुलांवर! इतकी वेगवेगळ्या रंगांची, आकारांची, छटांची फुलं निसर्ग कसा काय तयार करतो? कुठून येतात हे रंग?"

अवनीच्या ह्या विचारांनी काकाला आनंद झाला. काका म्हणाला, "तुला म्हणतात की नाही, तू आईसारखी दिसतेस म्हणून?"

"हो, पण ते अनुवांशिकतेमुळे किंवा जनुकांमुळे असतं ना!" आपलं ज्ञान सांगून अवनी मोकळी झाली.

मावशीने छान लाल आणि जांभळ्या रंगांची फुलं तिच्या हातात दिली. "अगं, फुलांमध्ये पण तसंच असतं. आपल्या त्वचेला जसा मेलॅनिनमुळे रंग येतो, तसा फुलांना अँथोसायनिन्स (Anthocyanins) ह्या रंगद्रव्यामुळे (Pigment) येतो. हे पाण्यात विरघळलेल्या स्वरूपात असतं. वनस्पतींमधील जनुकांमुळे विविध रंगद्रव्यं तयार होतात. हे जे लालसर गुलाबी रंगाचं फूल आहे ना, त्यात वनस्पतींनी अशी रंगद्रव्यं तयार केली आहेत, जी प्रकाशातील लालसर गुलाबी सोडून सगळे रंग शोषून घेतात. त्यातील तो रंग परावर्तित होतो, म्हणून ते फूल आपल्याला लालसर गुलाबी दिसतं."

"एकाच रंगद्रव्याची भारी किमया!" अवनी उद्गारली.

"हे एकच नाही बरं का. कॅरोटीन, जे गाजरात असतं ना ते लाल, पिवळा असा रंग देतं. झान्थोफिल पिवळा, तर क्लोरोफिल हिरवा."

"नुसती ही रंगद्रव्यंच नाहीत, तर अजून काही घटकांवर फुलांचा रंग ठरतो. फुलं तयार होताना त्यांना मिळालेला सूर्यप्रकाश, त्या भागातील तापमान, आणि तिथलं वातावरण!"

अवनीची सहल मस्त झाली होती. एकदम खुशीत येऊन ती म्हणाली, "ट्रीप मस्त झाली. मला नवीन माहितीसुद्धा मिळाली."

निसर्गाचा गालिचा बघत ती तिच्या भावविश्वात रमली होती!


**-डॉ. हर्षदा बाबरेकर**

*harshada98@gmail.com*

*(विज्ञानलेखक)*

**“काका,** काका, तुम्हांला माहीत आहे, ऋतिक रोशन लहानपणी तोतरा बोलायचा!” घरात शिरल्या शिरल्या मुग्धाने एखादा रहस्यफोट करावा, अशा थाटात सांगून टाकलं.

“हे तुला कोणी सांगितलं?”

“काका, मी आजच पेपरात वाचलं ते!”

“अरे व्वा, म्हणजे तू पेपरपण वाचतेस वाटतं!” असं मी म्हटल्यावर फुरंगटून मुग्धा म्हणाली, ‘‘हे हो काय काका! मी नुस्ती गोष्टींची पुस्तकं नाही वाचत. मला पेपर वाचायला जाम आवडतं. किती धम्माल माहिती असते त्यात. सॉलिड मजा येते.”




# ‘अंऽऽअं’ वर उपाय!

मी म्हटलं, “अगं, अनेक प्रसिद्ध माणसं तोतरं बोलायची. गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधणारा न्यूटन, उत्क्रांतीचा शोध लावणारा डार्विन, जगप्रसिद्ध अभिनेत्री मर्लिन मॅनरो, एवढंच नाही तर भाषणांसाठी प्रसिद्ध असणारे चर्चिल आणि लेनिन यांच्यासारखे थोर नेतेही तोतरं बोलायचे.”

मुग्धा हसत म्हणाली “काका, कुठल्यातरी सिनेमात शाहरूख क-क-क किरण म्हणायचा. ‘हिचकी’मध्ये राणी मुखर्जी अडखळत बोलायची. हे असं बोलताना जिभेला ठेच लागल्यासारखं अडखळायला कसं होतं?”

“मुग्धा, आपण बोलतो, तेव्हा सुरुवातीला आपल्या मनात विचार येतो. ते सांगण्यासाठी मेंदू शब्द ठरवतो. आणि चेहरा, मान, जीभ, स्वरयंत्र यांच्या स्नायूंना सूचना देतो. मग आपण ते शब्द म्हणतो. हे सर्व क्षणात होतं. ही क्रिया काही कारणाने नीट झाली नाही तर बोलताना अडखळायला होतं.”

“एखादा शब्द लवकर सुचला नाही तर सगळेच जण अंऽऽअं करतात. बोलणं शिकणाऱ्या लहान मुलांच्या मनात खूप कल्पना येतात; त्या सांगण्याइतके शब्द त्यांना माहीत नसतात. त्यामुळे

**तोतरेपणा का येतो? तोतरी माणसं गाणं म्हणू शकतात का? तोतरेपणा कायम राहतो की जाऊ शकतो?**

नर्सरीतली जवळजवळ अडीच टक्के मुलं तोतरी बोलतात. दोन वर्षांत त्यांचं बोलणं सुधारतं. म्हणून पाच वर्षांपर्यंत मूल तोतरं बोलत असेल, तर काळजी करायला नको. खूपदा आईवडील अशा मुलाला दटावत राहतात की, नीट बोल. त्यामुळे मुलं घाबरून आणखीन तोतरं बोलतात."

"सहा वर्षांनंतर बोलण्यात आपणहून सुधारणा झाली नाही तर अशा मुलांना स्पीच थेरपीस्टकडे नेणं आवश्यक असतं."

"कुटुंबातल्या पहिल्या मुलग्यांमध्ये तोतरेपणाची शक्यता जास्त असते. डाव्या हाताने लिहिणाऱ्या मुलाला उजव्या हाताने लिहायची सक्ती केली, तरी हा दोष निर्माण होऊ शकतो."

"पण मुग्धा, तोतरं बोलणारा माणूस बुद्धू नसतो बरं का! खूपदा तो सर्वसामान्य माणसापेक्षा हुशार असतो. तोतरं बोलताना जिभेचे, स्वरयंत्राचे स्नायू आखडतात. टेन्शन वाढलं की, ते जास्त आखडतात. मित्र चिडवत राहिले, आईबाबा ओरडत राहिले तर हा त्रास वाढतो. घरात कोणी तोतरं असलं तरी ही शक्यता वाढते."

"काका, शब्दच नीट फुटत नसेल तर किती वाईट वाटत असेल ना तोतरं बोलणाऱ्याला!"

"हो ना, बहुधा पहिलं अक्षर बोलताना स्वरयंत्र उघडायला त्रास होतो. त्यामुळे मुलांना जास्त टेन्शन येऊन ती डोळे मिचकावतात, तोंड वाकडं करतात किंवा मानेला झटका देतात. कोणी बोटांनी चुटकी वाजवतो, कोणी डोकं खाजवतो. बहुतेकजण समोरच्या माणसाकडे पाहायचं टाळतात."

"काका, ही तोतरी माणसं गाणं म्हणू शकतात का? कारण गाताना ते अडखळले तर त्यांना तालात गाताच येणार नाही."

"गाणं म्हणताना कुठला शब्द केव्हा म्हणायचा हे ठरलेलं असतं, त्यामुळे मेंदूचा गोंधळ होत नाही. म्हणूनच तोतरं बोलणारे गाणं मस्त तालात म्हणू शकतात. सावकाश बोलताना, कुजबुजल्या स्वरात बोलताना किंवा नक्कल केल्यासारखं वेगळ्या आवाजात बोलताना त्यांना त्रास होत नाही. पण अनोळखी माणसाशी किंवा अधिकारी व्यक्तीशी बोलताना किंवा ग्रूपमध्ये असताना तसंच फोनवर बोलताना अडखळणं वाढतं. म्हणून खूपजण अशा प्रकारचं बोलणंच टाळतात. स्वतःचं नाव सांगताना तर तोतरेपणा हमखास वाढतो."

"काका, हृतिक तर आता तोतरं बोलत नाही, मग ते त्याने कसं काय केलं असेल?"

"तोतरेपणावर मात करायची तर 'मी नक्की नीट बोलू शकेन' असा स्वतःला विश्वास देणं महत्त्वाचं असतं. आरशात पाहून बोलण्याची प्रॅक्टिस केल्याने आणि अगदी ठरवून सावकाश बोलण्याने फायदा होतो. तोतरं बोलणाऱ्याशी आपण जेव्हा बोलतो, तेव्हा त्यांना टेन्शन येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. त्यांना कधी हसू नये. त्यांच्याशी नजरेला नजर भिडवूनच बोलावं. त्यांचं बोलणं शांतपणे ऐकावं. 'घाबरू नको, सावकाश बोल' असे सल्ले देऊ नयेत. त्यांचं वाक्य आपण पूर्ण करू नये. अशाने त्यांना अधिक टेन्शन यायची शक्यता असते."

[redacted]

"तुम्ही म्हणालात ना, स्पीच थेरपिस्ट, ते काय करतात?" मुग्धाचा हा नवा प्रश्न.

"सावकाश कसं बोलावं, बोलताना श्वासावर नियंत्रण कसं ठेवायचं हे ते सांगतात. काही व्यायाम करायला सांगतात. टेन्शन कमी करण्यासाठी ध्यान, योग यांचाही उपयोग होतो. तोतरं बोलणं हा सवयीचा भाग झालेला असतो. ती सवय जाण्यासाठी चिकाटीची आणि मेहनतीची गरज असते."

"म्हणजे काका, ठरवलंच तर स्पीच थेरपिस्ट आणि मित्र, नातेवाईक यांच्या मदतीने कोणालाही तोतरेपणावर मात करायला जमेल."

"अगदी बरोबर," मुग्धाला शाबासकी देत मी म्हटलं.

**-डॉ. प्रमोद बेजकर**
*pramodbejkar@gmail.com*
*(फॅमिली फिजिशियन आणि लेखक)*

**तुला नऊ अक्षरांचा गट दिला आहे. यातील एक मित्र-अक्षर आहे; हे ओळख आणि सात अर्थपूर्ण शब्द तयार कर.**

**गट- का पा गा वा जा डी सा मा ना**

उत्तर- काडी, पाडी, गाडी, वाडी, जाडी, साडी, माडी, नाडी

*आशावादी : ग्लास अर्धा भरलेला आहे.*
*निराशावादी : ग्लास अर्धा रिकामा आहे.*
*वास्तववादी : आज नळाला पाणी कमी आलेलं आहे, जपून वापरावं.*

# रवींद्रनीती

इसापनीतीच्या गोष्टींसारख्या काही छोट्या कविता रवीन्द्रनाथ टागोर यांनी रचल्या आहेत. मुक्तछंदात रचलेल्या साध्या-सोप्या मूळ बंगाली कवितेचा हा मराठी अनुवाद-



## सदिच्छा

हार गुंफायच्या वेळी फुलांच्या देठात
सुई खुपसे हारवाला दोनदा जोरात
सुई म्हणे दुःखाने, अगं जुई दीदी,
हजारो फुलांना टोचते मी प्रतिदिनी.
किती सुगंध अन् कोमलता आहे तुमच्या ठायी
इतकी डोकी फोडून मला काही मिळत नाही.
देवापाशी मागते वर,
दोन्ही कर जोडून,
सुई होऊन टोचण्यापेक्षा,
उमलू दे मला फूल होऊन.
जुई म्हणे निःश्वास टाकून, ओहो, तेच होऊ दे
तुझं टोचणं जाऊ दे अन् माझं रक्षण होऊ दे.

**मूळ कविता- रवींद्रनाथ टागोर**
**-अनुवाद- सुमती जोशी**
*sumatijoshi154@gmail.com*

# I can't... Witty Talks

**Noundita :** *Why hasn't the pizza arrived yet?*

*<Noundita and Verbojith were waiting for the pizza delivery person when Verbojith received a call on his mobile. 'I can't able to find your address, Sir…' the person said to which Verbojith gave him instructions. Verbojith smiled as the call ended.>*

**Noundita :** *Why are you smiling?*

**Verbojith :** *'I can't able to…' this is another unique error that people commit. 'I can't able to find my keys', 'I can't able to login to the app' or 'I can't able to restart the computer'…*

**Noundita :** *Actually, 'can' or 'can't' or 'cannot' is the ability of a person whether they can do a particular action or not.*

**Verbojith :** *The correct way is to say 'I can do it'; 'I can't find the keys'; 'I cannot login to the app' or 'I am not able to restart the computer'. Even 'I am unable to come today' is the correct form.*

**Noundita :** *When we use 'can't' and 'able' together in one sentence, we are basically repeating the word 'able'.*

**Verbojith :** *Exactly. And then the sentence 'I can't able to…' gets interpreted as 'I am not able to able to find your address…'*

**Noundita :** *So, we need to be very careful with the words that we pick in our conversation.*

*<Just then, the delivery person delivered the pizza.>*

**Verbojith :** *Wow, what a huge one!*

**Noundita :** *Hey, the pieces are too big. I can't able to… nah… I cannot eat them in one go. Let's cut them into smaller ones.*

*<Verbojith went to the kitchen to search for a knife.>*

**Verbojith :** *But I am not able to find it.*

**Noundita :** *You anyway can't, in my messed up kitchen…*

*<Noundita smiled and went to help Verbojith.>*

**-Prachi Mokashi** | *mokashiprachi@gmail.com*

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्
# वयम्
आपण सारे

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इमेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in



## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ११००/-**
डिलिव्हरी चार्जेससहित

**१० + १ दिवाळी अंक**

scan here to pay

नोंदणी क्रमांक : .................... दिनांक : ....................

नाव : ....................

पत्ता : ....................

.................... पिन कोड : ....................

जवळची खूण : ....................

फोन : .................... इमेल : ....................

जन्मतारीख : .................... इयत्ता : ....................

शाळा : ....................

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : .................... बँक व बँक शाखा : ....................

चेक दिनांक : .................... रुपये : ....................

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्टुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा.

सही : ....................

*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*



कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
अहम् आवाम्
वयम्
ऐकता ऐकता वाचू या!
गोष्टी
शब्दरंजन
स्पर्धांची
गप्पाटप्पा
चौकस-चौरस
कल्पक
मुलांचं आवडतं
वयम् मासिक आता श्रवणीय! -
वयम् ॲप
GET IT ON Google Play
Download on the App Store
आत्ताच Wayam App डाउनलोड करा,
ऐका आणि तुमची प्रतिक्रिया कळवा.
www.wayam.in | 7045453343

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2023-2025 Post at Thane Head Post Office- 400601, Published on 1st of every month and posted on 5th of every month

Some objects are playing hide & seek on the coverpage, can you find them all?




# Hide & Seek

*Illustrated by Mahimkar Sisters*